cmyk

## संपादकीय

### सरकारी कर्मचारी तुपाशी खासगी मात्र उपाशी

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नव्या वर्षात मोठी भेट जाहीर केली आहे. केंद्र सरकारने गुरुवारी आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली. या निर्णयामुळे देशातील ५० लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात मोठी वाढ होणार आहे. तसेच ६५ लाख पेन्शनधारकांनाही या निर्णयाचा लाभ होणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती दिली.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com




बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२६८ | रविवार, दि.१९ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


# शेतकरी कर्जमाफीत लाडक्या बहिणींचा अडथळा?

## तिजोरीवर ताण वाढल्याने आश्वासन देऊनही कर्जमाफीची टाळाटाळ

**पुणे । प्रतिनिधी**

**लाडक्या बहीण योजनेचा इतर योजनांवर परिणाम झाला नाही, असा दावा सरकारने न्यायालयात केला असला तरी प्रत्यक्षात मात्र अनेक योजना यामुळे रखडल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांना प्रतिक्षा असलेली कर्जमाफीही लाडक्या बहीण योजनेच्या आर्थिक ताणामुळे झाली नाही. या योजनेचा ताण कमी होत नाही तोपर्यंत कर्जमाफी शक्य नाही, असे अनेक तज्ज्ञांचे आणि काही अधिकाऱ्यांचेही म्हणणे आहे.**

शेतकऱ्यांची कर्जे थकल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. खात्यात जमा झालेले लाभ किंवा माल विक्रीचे पैसे कर्ज खात्यात वळते केले जात असल्याचे शेतकरी सांगत आहेत. थकबाकीमुळे नविन कर्ज तर मिळत नाही. पण गेल्या दोन वर्षांपासून शेतीमालाचे बाजारभाव कमी आहेत. त्यातून उत्पादन खर्चही निघत नाही. मग कर्ज कसे भरायचे? अशा विवंचनेत शेतकरी आहेत. एकंदरीत कर्जामुळे शेतकरी एका चक्रव्यूव्हात अडकले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफीची गरज आहे. कर्जमाफीची मागणी



शेतकरी तसे गेल्या वर्षभरापासून करत आहेत. लोकसभा निवडणुकीतही ही मागणी पुढे आली होती. पण विधानसभा निवडणूकीत या मागणीने जोर धरला. लोकसभेत फटका बसल्यानंतर महायुतीनेही कर्जमाफीचे आश्वासन दिले. आश्वासन देणारे देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री झाल्याने कर्जमाफीच्या अपेक्षा उंचावल्या. मात्र सरकार स्थापन होऊन आता दोन महीन होतील. तरीही कर्जमाफी झाली नाही. सरकार कर्जमाफीसाठी अनुकूल आहे. पण सरकारच्या तिजोरीत खडखडाट आहे. त्यातच लाडक्या बहीण योजनेचा आर्थिक ताण वाढला आहे. लाडक्या बहीणींना सध्या महिन्याला किमान ३७०० कोटी रुपये द्यावे लागत आहेत. हा खर्च महिन्याला येतो. ◀◀ पान २ वर


### शेतकऱ्यांना प्रतिक्षाच करावी लागणार

सरकार लाडक्या बहीण योजनेचा आर्थिक ताण कमी करण्यासाठी जास्तीत जास्त महीलांना योजनेतून बाहेर काढत आहे. त्यासाठी नियमांच्या आधारवर पडताळणी केली जात आहे. लाडक्या बहीण योजनेचा ताण कमी झाल्यानंतर निधीची तजवीज झाल्यानंतर सरकार कर्जमाफी जाहीर करेल, असेही सांगितले जात आहे. पण या प्रक्रियेला वेळ लागणार आहे. तोपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी सरकार देऊ शकणार नाही. म्हणजेच कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांना आणखी वाट पाहावी लागेल,असे दिसते आहे.

## धनंजय मुंडेंचा पत्ता कट!

# अजित पवार पुणे- बीडचे पालकमंत्री

### पंकजा मुंडे यांच्याकडे जालन्याची जबाबदारी



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे पालकमंत्री कधी घोषित होणार याची चर्चा सुरु असतानाच शनिवारी संध्याकाळी राज्यातील पालकमंत्री जाहीर करण्यात आले. त्यानुसार आता बीड आणि पुण्याच्या पालकमंत्रीपदी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर धनंजय मुंडे यांचे नाव पालकमंत्रीपदाच्या यादीतून वगळण्यात आले आहे. मंत्री पंकजा मुंडे या जालन्याच्या पालकमंत्री असणार आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेला मुद्दा म्हणजे पालकमंत्रीपद. शनिवारी रात्री सरकारने पालमंत्रीपदांची यादी जाहीर केली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली तर संतोष देशमुख हत्या प्रकरणी चर्चेत असलेले बीडच्या ◀◀ पान २ वर

# राख विक्रीच्या कंपनीत धनंजय मुंडे-वाल्मिक कराड यांच्यात भागिदारी!

## अंजली दमानिया यांनी पुरावा देत केली राजीनाम्याची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**परळीतील औष्णिक ऊर्जा कंपनीकडून निर्माण होत असलेली राख जी महाजनकोकडून टेंडर काढून विकली जाते किंवा ती मोफत दिली जाते. त्या राखेतून कोट्यावधी रूपयांची कमाई धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्याकडून केली जात असल्याची चर्चा सुरु होती. त्यासंदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी शनिवारी व्यंकटेश्वरा नावाच्या एका कंपनीतील भागिदारांची माहितीच उघड केली आहे. यावरून त्यांनी धनंजय मुंडे यांच्या राजिनाम्याची मागणी पुन्हा एकदा केली आहे.**





अंजली दमानिया यांनी उघड केलेल्या कागदपत्रांच्या आधारे व्यंकटेश्वरा या कंपनीत यापूर्वी धनंजय मुंडे, त्यांच्या पत्नी राजश्री मुंडे या मेजर शेअर होल्डर आहेत. या कंपनीत संचालक म्हणून वाल्मिक कराड याचेही नाव होते. आजही या कंपनीत वाल्मिक कराड हे शेअर होल्डर म्हणून आहेत. एकाबाजूला मेजर शेअर होल्डर म्हणून धनंजय मुंडे हे आहेत. धनंजय मुंडे हे राज्याच्या मंत्रिमंडळात आहेत, तर महाजनको ही संपूर्णतः राज्य सरकारची सबसिडर कंपनी आहे. ◀◀ पान २ वर

## खंडणीच्या गुन्ह्यात वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर २० तारखेला सुनावणी

बीडः वाल्मिक कराडच्या खंडणीच्या गुन्ह्यातील जामीन अर्जावर केज जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. जामीन अर्जावर येत्या २० तारखेला केज जिल्हा सत्र न्यायालयामध्ये सुनावणी होणार आहे. वाल्मिक कराडच्या वकिलांनी न्यायालयाकडे २२ तारखेला पुढील सुनावणी व्हावी अशी मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने सुनावणीसाठी २० तारीख दिली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात आहे. काही दिवसांपूर्वी वाल्मिक कराडवर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.



मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यामध्ये केज जिल्हा सत्र न्यायालयाने न्यायालयाने कोठडी सुनावल्यानंतर कराडच्या वकिलाने कोर्टामध्ये लगेच जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. या अर्जाला सीआयडीकडून कोर्टामध्ये आव्हान देण्यात आले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी मकोका लागलेल्या कराडची सीआयडीला चौकशी करायची आहे. म्हणून वाल्मिक कराडला जामीन देऊ नये, अशी विनंती सीआयडीने कोर्टाकडे केली होती.

## अरविंद केजरीवाल यांच्या वाहनावर दगडफेक

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात जोर वाढताना दिसून येत आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आम आदमी पक्षात आणि भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. शनिवारी (दि.१८) दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कारवर दगडफेक झाल्याचा आरोप आपकडून करण्यात आला आहे. या घटनेनंतर आपकडून भाजपवर गंभीर आरोप करण्यात आले.


आम आदमी पक्षाने त्यांच्या अधिकृत एक्सवरून हल्ल्याचा व्हिडिओ पोस्ट केला, ''भाजप पराभवाला सामोरे जाण्यास घाबरत आहे. अरविंद केजरीवाल यांच्यावर भाजपच्या गुंडांनी हल्ला केला'' भाजप उमेदवार प्रवेश वर्मा यांच्या गुंडांनी प्रचारादरम्यान अरविंद केजरीवाल यांच्यावर विटा, दगडफेक केली. प्रचार करू नये म्हणून त्यांना दुखापत करण्याचा प्रयत्न केला. भाजपवाल्यांनो, केजरीवालजी तुमच्या भ्याड हल्ल्याला घाबरणार नाहीत, दिल्लीचे लोक तुम्हाला योग्य उत्तर देतील. अशी टीका करण्यात आली आहे.

### हत्या प्रकरणात सीआयडीकडून कारवाई सुरु

संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडीकडून कारवाई सुरु आहे. यामध्ये सुदर्शन घुलेसह ७ आरोपींवर मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच या प्रकरणातील आरोपींवर संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत कारवाई करणार असल्याचे सांगितलं होते. त्यानंतर या प्रकरणातील सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, जयराम चाटे, प्रतीक घुले, महेश केदार आणि कृष्णा आंधळे हे सहा आरोपी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. त्यामुळे या आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, यातील कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे.

## आरोपींचे आदल्यादिवशी हॉटेलवर जेवण, त्याच ठिकाणी संतोष देशमुखांच्या हत्येचा कट रचला?

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सीआयडी आणि एसआयटीकडून करण्यात येत आहे. अशातच संतोष देशमुखांच्या हत्या प्रकरणात आता आणखी एक नवी माहिती पुढे आली आहे. संतोष देशमुख यांची हत्या होण्यापूर्वी एक दिवस आधी म्हणजे ८ डिसेंबर रोजी घटनेतील आरोपींनी बीड-अंबाजोगाई महामार्गावरील




तिरंगा हॉटेलवर जेवण केल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे याच हॉटेलवर देशमुख यांच्या हत्येचा कट रचल्याचा संशय व्यक्त करत पोलिसांनी त्या दिशेने तपास सुरू केल्याची माहिती पुढे आली आहे. परिणामी, तपास यंत्रणेने हॉटेल मालकाची चौकशी करून सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्याची प्रक्रिया आता सुरू केली आहे. तपास यंत्रणेला योग्य ते सहकार्य केल्याचे हॉटेल मालक बाबुराव शेळके यांनी सांगितले.

## हॉल तिकिटावर जातीचा उल्लेख; भुजबळ,पटोलेंची शिक्षणविभागावर टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

**दहावी आणि बारावी परीक्षांच्या हॉल तिकिटावर आता थेट जातीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. पहिल्यांदाच बोर्डाच्या परीक्षेच्या हॉल तिकिटावरती जातीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता याबद्दल राजकीय वर्तुळातून देखील टीका केली जात आहे. छगन भुजबळ आणि नाना पटोले यांनी या प्रकरणावरून शिक्षण विभागावर टीका केली आहे.**

छगन भुजबळ यांनी म्हटले आहे की, फुले-शाहू-आंबेडकरांना मानणारे अनेक राज्यकर्ते आहेत. त्यांनी याबाबत ◀◀ पान २ वर



## सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आता तेजस, वंदे भारत आणि हमसफर ट्रेनमध्ये मोफत प्रवास

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आणखी एक मोठी घोषणा केली आहे. एलटीसी अंतर्गत, त्यांना वंदे भारत एक्सप्रेस, हमसफर आणि तेजस सारख्या लक्झरी ट्रेनमध्ये मोफत प्रवास करण्याची सुविधा देण्यात आली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना आता एकूण ३८५ गाड्यांमध्ये प्रवास करण्याचा पर्याय आहे. ज्यात १३६ वंदे भारत एक्सप्रेस, ९७ हमसफर आणि ८ तेजस एक्सप्रेस गाड्यांचा समावेश आहे. यापूर्वी, ते राजधानी, शताब्दी आणि दुरांतो सारख्या १४४ हाय-एंड ट्रेनमध्ये एसी प्रवासाचा आनंद घेऊ शकत होते. या निर्णयामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना देशातील सर्व भागात एलटीसी प्रवास बुकिंगसाठी अधिक पर्याय उपलब्ध होतील. कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाला एलटीसी अंतर्गत वेगवेगळ्या प्रीमियम ट्रेन्सबाबत सर्व कार्यालये आणि कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सूचनांनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३.५० क्विंटल | ३,५०० | ३,५४० | ३,५२० |
| ज्वारी/हायब्रिड: ५३.०० क्विंटल | १,८०० | २,९३० | २,४९४ |
| मका/लोकल: ०.५० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १३५.५० क्विंटल | ६,४६० | ७,२५१ | ७,०२४ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| बाजरी: १.५० क्विंटल | ३,५०० | ३,५०० | ३,५०० |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,१०१ | ६,१०१ | ६,१०१ |
| सोयाबीन: ९५.५० क्विंटल | ४,००० | ४,११६ | ४,०७४ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,८०१ | ६,००० | ५,९०० |

# अजितदादांच्या राष्ट्रवादीचा स्वबळाचा नारा!

## पक्षातील नेते म्हणाले, शक्य असेल तिथे एकत्र नाहीतर स्वतंत्र लढू; शिर्डी अधिवेशनात भाजपाला परखड इशारा

**शिर्डी । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले तर महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत.**

सर्वच राजकीय पक्षांकडून होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची जोरदार तयारी केली जात आहे. अलीकडेच शिवसेना ठाकरे गट महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका स्वबळावर लढणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली. यामुळे महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडल्याचे पाहायला मिळाले. या पाठोपाठ आता राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्यांनी स्वतंत्र लढण्याच्या केलेल्या वक्तव्याने महायुतीत देखील मिठाचा खडा पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शनिवार दि.१८ रोजी शिर्डी येथे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अधिवेशन पार पडत आहे. या अधिवेशानासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार प्रफुल्ल ◀◀ पान २ वर

### महायुती म्हणूनच निवडणुकिला सामोरे जाऊ–बावनकुळे

अजित पवार गटाच्या नेत्यांच्या वक्तव्यावर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, त्यांनी जरी स्वबळाचा नारा दिला असेल तरी आम्ही महायुती म्हणूनच समोर जाणार आहोत. स्थानिक युनिट म्हणूनच आम्ही विचार करू. दाद काय बोलले? हे आम्हाला माहीत नाही. त्यांच्या पक्षाचा निर्णय करण्याचा त्यांना अधिकार आहे. मात्र महायुती म्हणून आम्ही सामोर जाणार आहोत. जिथे जिथे शक्य असेल तिथे तिथे महायुती म्हणून लढू, असे त्यांनी म्हटले आहे.

cmyk

cmyk



## अग्रलेख

# सरकारी कर्मचारी तुपाशी खासगी मात्र उपाशी

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नव्या वर्षात मोठी भेट जाहीर केली आहे. केंद्र सरकारने गुरुवारी आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली. या निर्णयामुळे देशातील ५० लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात मोठी वाढ होणार आहे. तसेच ६५ लाख पेन्शनधारकांनाही या निर्णयाचा लाभ होणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती दिली. मात्र, आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

आठवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात बंपर वाढ होऊ शकते. फिटमेंट फॅक्टर किमान २.८६ निश्चित केल्यास कर्मचाऱ्यांच्या किमान मूळ वेतनात वाढ होऊन तो ५१,४८० रुपये असू शकतो. सध्या किमान मूळ वेतन १८ हजार रुपये आहे. पेन्शनधारकांनाही असेच फायदे मिळतील. त्यांचे किमान पेन्शन ९ हजार रुपयांवरून २५,७४० रुपयांपर्यंत वाढू शकते. फिटमेंट फॅक्टर हा सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांचे पगार आणि पेन्शन वाढवण्यासाठी वापरायचे सूत्र आहे. या आधारे विविध स्तरांवर पगार वाढवला जातो.

नवा वेतन आयोग नेमका कधी स्थापन केला जाईल हे अजून स्पष्ट झाले नसले तरी एका वर्षात आयोगाला शिफारशी सादर कराव्या लागणार आहेत. आयोगाच्या अध्यक्ष व दोन सदस्यांची लवकरच नियुक्ती केली जाईल. केंद्रीय कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी, महागाई भत्ता, अन्य आर्थिक लाभ, निवृत्तिवेतन आदींचा दर १० वर्षांनी फेरआढावा घेतला जातो. वाढती महागाई लक्षात घेऊन वेळोवेळी महागाई भत्त्यामध्ये वाढ केली जाते. मात्र काळानुसार कर्मचाऱ्यांचा जीवनस्तर कायम राखण्यासाठी त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये बदल करण्याची गरज असते. त्यासाठी वेतन आयोगाच्या माध्यमातून केंद्र सरकार केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचा फेरआढावा घेते. मनमोहनसिंग सरकारच्या काळातील सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी मोदी सरकारने जानेवारी २०१६ मध्ये लागू केल्या. ही मुदत पुढील वर्षी २०२६ मध्ये संपत असल्यामुळे त्याआधी नव्या वेतन आयोगाला केंद्र सरकारकडे अहवाल द्यावा लागेल. वास्तविक वेतन आयोगाला शिफारशी सादर करण्यासाठी दीड-दोन वर्षांचा कालावधी लागतो. मनमोहनसिंग सरकारने वेतन आयोग स्थापन केल्यानंतर १८ महिन्यांनी अहवाल सादर झाला होता. यावेळी मात्र वेतन आयोगाला जेमतेम वर्षभराचा कालावधी मिळू शकेल. आतापर्यंत १९४७ पासून सात वेतन आयोग स्थापन करण्यात आले.

आठवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर सरकारी कर्मचाऱ्यांना भरघोस वेतनवाढ मिळणार आहे. शिपायापासून ते आयएएस अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या पगारात मोठी वाढ होणार आहे. सातवा वेतन आयोग लागू झाला तेव्हा लेव्हल वनचे कर्मचारी शिपाई, सफाई कामगार यासारख्या कर्मचाऱ्यांचे बेसिक वेतन १८ हजार रुपयांवर पोहोचले होते. आठवा वेतन आयोग लागू झाला तर त्यांचे बेसिक वेतन २१ हजार ३०० रुपयांवर पोहोचण्याची शक्यता आहे. लेव्हल २ कर्मचाऱ्यांचे वेतन सातवा वेतन आयोग लागू झाला तेव्हा १९ हजार ९०० इतके होते, ते वाढून २३ हजार ८८० रुपयांवर पोहोचण्याची शक्यता आहे. लेव्हल ३ च्या कर्मचाऱ्यांचे बेसिक वेतन २१ हजार ७०० वरून २६ हजार ४० रुपये, लेव्हल ४च्या कर्मचाऱ्यांचे बेसिक वेतन २५ हजार ५०० वरून ३० हजार ६०० वर तर लेव्हल ५ च्या कर्मचाऱ्यांचे वेतन २९ हजार २०० वरून ३५ हजार ४० रुपयांवर पोहोचण्याची शक्यता आहे.

केंद्रीय कर्मचाऱ्यांना भरघोस वेतनवाढ मिळणार असेल तर राज्य कर्मचारी कसे गप्प बसतील? त्यांनीही आठव्या वेतन आयोगाची मागणी केली आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग नेमण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर राज्यातही आठवा वेतन आयोग लागू करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघातर्फे लगेचच गुरुवारी करण्यात आली. केंद्रामध्ये ज्या तारखेपासून आठवा वेतन आयोग लागू होईल, त्याच तारखेपासून महाराष्ट्र शासनाने या निर्णयाची राज्य सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी अंमलबजावणी करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक कुलथे यांनी केली आहे. केंद्र सरकारप्रमाणे राज्य सेवेतील कर्मचाऱ्यांना सेवासुविधा देण्याचे राज्य सरकारचे प्रचलित धोरण आजपर्यंत राहिलेले आहे. २८ फेब्रुवारी २०१४ रोजी सातवा वेतन आयोग स्थापन करण्यात आला होता. त्याच्या शिफारशी १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात आल्या. या वेतन आयोगाद्वारे केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचे किमान मूळ वेतन ७ हजार रुपयांवरून १८ हजार रुपये करण्यात आले होते. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगाराचा निर्णय घेण्यात फिटमेंट फॅक्टर महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यानुसार आठवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर केंद्रीय कर्मचाऱ्यांचे वेतन गगनाला भिडणार आहे. दुसरीकडे खासगी संस्थांमधील कर्मचाऱ्यांचे काय? सरकारी कर्मचारी तुपाशी तर खासगी कर्मचारी उपाशी असेच चित्र राहणार असल्याचे दिसत आहे.

# संतोष (आण्णा) च्या जाण्याने निर्माण झालेला असंतोष?

**लाखो क्षण अपूर्ण पडतात**
**आयुष्याला दिशा देण्यासाठी...**
**आपली एक चूक कारणीभूत**
**ठरते ते दिशाहीन करण्यासाठी....**

होय, ती एकच चुक म्हणावी लागेल जी आयुष्य दिशाहीन नव्हे तर उद्ध्वस्त करून गेली. खरंच का ही आमच्या संतोष (आण्णा) ची एका विशिष्ट जातीच्या मुलाला (सेक्युरिटी) वाचवण्याची ही चुक'' म्हणावी लागेल? तर नाही कधीच नाही.

माणसाने माणसाशी माणसासम वागणे या विचारधारेवर चालणारा, समाजाप्रती आपुलकी असणारा, लहान-थोरापासून प्रिय, निरागस चेहरा आणि उल्लेखनीय म्हणजे निखळ हास्य असणारा अठरा पगड जाती सोबत घेऊन चालणारा हा हिरा फक्त कुटुंबानेच नव्हे, गावानेच नव्हे, जिल्ह्यानेच नव्हे, विशिष्ट पक्षाने नव्हे तर ज्यांच्या हृदयात ''माणुसकी'' नावाचा एक भाग आहे त्या प्रत्येकानेच गमावला आहे. गेली बरेच दिवस (१ महिन्यापेक्षा जास्त) मस्साजोग गाव चर्चेचा विषय बनला. विषय हा अतिसंवेदनशील असल्याने मनात संभ्रम होता की, लेखणी हातात घ्यावी की नाही? दिवसभरातील घडामोडी गेली महिना झाले वारंवार पहात होते. त्यामध्ये एक व्हिडीओ पाहिला आणि अश्रूचा बांध फुटला. संतोष (आण्णा) ची पत्नी मोठ्याने धाय मोकलून रडत होती. बहीण (प्रियंका चौधरी) चक्कर येऊन पडली. आई



रडतेय भावाची घालमेल होतेय आणि डोळ्यासमोरून न जाणारे ते दोन लेकरं वैभवी आणि विराज निशब्द.

भारतवासीय संविधान या संकल्पनेवर हा देश चालवतात. संविधानात अमानवीय कृत्यांना कुठेच दुजोरा दिलेला नाही. हा खून कसा झाला? कुठे? कोणी केला? आरोपी कोण? हे धडधडीत सर्वांना माहित आहे. परंतु तरीही तत्कालिन पोलिसांनी ना खंडणी गुन्ह्याची नोंद केली ना अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्याची केली. पोलिसांनो, तुमची ही एक चूक एका दूरदृष्टी असणाऱ्या कलम ३० अ-१ अ नुसार निवडून आलेल्या सरपंचाचं आयुष्य उद्ध्वस्त करणारी ठरली. हे या महाराष्ट्राचं दुर्दैव. एखादं कुत्रं चावलं ना तरीदेखील त्याला २-४ दगडं आणि फारच फार तर २-३ काठ्या घालू शकतो. विशिष्ट समाजच नव्हे तर मानवतेला लाजवेल असं अमानवीय कृत्य करून आरोपींनी त्यांना मारलं. त्यांचा मारताना व्हिडिओ केला. मृत अवस्थेतील फोटोसुद्धा जिवाला चुटका लावून जाणारा होता. अशी म्हणण्याची वेळ आली की, कदाचित एकाच फटक्यात देवाज्ञा झाली असती तर बरं झाल असतं. माफ करा परंतु पाणी मागण्याची वेळ तरी नसती आली. एवढ झालेलं कमीच होत तरी पोलिसांनो गुन्हा नोंदवला नाही. ज्यावेळी जरांगे पाटील आले तेव्हा गुन्हा नोंदवला आणि तोही थातूरमातूर. पोलिसांनो, तुमच्या घरी आई-बहीणी, भाऊ-वडील, बायका-पोरं असतील की. कुटुंबाच्या वेदना नाही का कळाल्या तुम्हाला? असो, याहीपेक्षा दिवट्याने जागरण गोंधळातील वातीवर तेलाचा डाव टाकावा असं वक्तव्य माजी पालकमंत्री साहेबांनी केलं. म्हणे खून तर सगळीकडेच होत राहतात. कत्ती, गॅस पाइप, क्लच वायर, फायटर इ. साहित्यांचा वापर करून, छातीवर नाचणे तथा पाणी न पाजणे, असे कृत्य करून झालेला खून आम्हाला दाखवा. कदाचित या प्रकारांची तुम्हाला सवय असेल, आम्हाला नाही. पंकजाताई, तुम्ही लोकसभेला पराभूत झालात. तुमच्या चाहत्यांनी आत्महत्या केल्या तुम्ही त्यांच्या घरी जाऊन ढसाढसा रडलात. ताई हा संतोष आण्णा तुमचा बुथ प्रमुख एवढ्या क्रूरतेने मारला गेला, तुम्ही एक महिना उलटूनही का भेटायला गेल्या नाहीत? पालकमंत्री व्हायचं असेल तर जिल्ह्यातील दुःखी कुटुंबाचं पालकत्व आधी जाणा आणि मग त्या खुर्चीकडे बघा. कदाचित तो तुमच्या समाजाचा-जातीचा भाग नसावा. तुमचं मन् फाशी घेतलेल्या माणसाबद्दल जेवढं पिळवटल गेलं तेवढं संतोष (आण्णा) बद्दल न पिळवटल्यामुळे. ताई, तुम्ही सुरेश (आण्णा) धस यांच्या प्रचारार्थ सभेत कडा या ठिकाणी बोललात, साडी घालते म्हणून मला अक्कल नाही, असं समजू नका'' पण मस्साजोग गावातील साड्या घालणाऱ्या सर्वच महिला खूनाचं, गुन्हेगारांचं, दहशतीचं वर्णन करत आहेत आणि तुमच्या डोळ्यावर कशाची पट्टीताई? मंत्री धनंजय पंडीतराव मुंडे आणि धनंजय पंडीतराव देशमुख हे आरोप मुंडे विरुद्ध देशमुख नसून समाजात जातीयवाद निर्माण करणारे नाहीत. तर धनंजयने सख्खा भाऊ गमावला आणि दुसरे धनंजय कदाचित कुणाला तरी भावासमान असणाऱ्याला पाठीशी तर घालत नाहीत ना? असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झालाय.

विधानसभेच्या अधिवेशनात मा. सुरेश आण्णा धस यांनी ज्यावेळी घडलेली हकीगत सांगितली त्यावेळी सुन्न झालेलं सभागृह पाहायला तुम्ही का उपस्थित नव्हता? कदाचित तुम्ही कोणत्या तरी दुसऱ्या कामात व्यस्त असावेत. परंतु जिल्ह्यातील मा. सुरेश आण्णा घस (आष्टी), संदिप क्षीरसागर (बीड), प्रकाश सोळुके (माजलगाव), विजयसिंह पंडीत (गेवराई), नमिता मुंदडा (केज) हे सर्वच उपस्थित असताना, एवढा ज्वलंत् अतिसंवेदनशील विषय मांडताना तुम्ही कुठे होतात साहेब.? कदाचित तेव्हा तरी तुम्हाला परिस्थितीचं गांभीर्य लक्षात आलं असतं आणि तुम्ही बहीण-भाऊ सांगताय की जाती-पातीचं राजकारण राजकारण करतात म्हणून. सुरेश (आण्णा) धस असतील अथवा मनोज (दादा) जरांगे असतील परंतु त्यांच्या सोबत खांद्याला खांदा देऊन या न्यायासाठीच्या लढ्यात सर्वच जाती धर्माचे लोक खंबीरपणे उभे आहेत. दसरा मेळाव्यात सुरेश (आण्णा) धस तुमच्या मंचावर उपस्थित राहिले, तुम्हाला लोकसभेला लीड मिळवून दिली तेव्हा नव्हतं का जाती-पातीचं राजकारण? आज अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, मयत माणूस कोणत्या जातीचा आहे हे बघून नव्हे तर त्याच्या शरीरावरील हृदय पिळवटून टाकणारे घाव बघून तर जाती-पातीचं राजकारण झालं? संविधानासमोर गुन्हा करणाऱ्याची आणि तो भोगणाऱ्याची जातपात बघितली जात नाही. अक्षरशः गावाला आदर्श गाव बनवणाऱ्या, गावाला तब्बल पंधरा पुरस्कार मिळवून देणाऱ्या, तीनदा सलग पंधरा वर्ष सरपंच असणाऱ्या व्यक्तीची ही अवस्था महाराष्ट्रासाठी दुर्दैवी बाब आहे. अहो एकदा संतोष आण्णांचा शाळकरी मुलांसोबत खो-खो खेळतानाचा, प्रचार करतानाचा, सण-वार साजरे करतानाचा व्हिडियो बघा. तेव्हा जाणीव होईल की घरातलंच कुणीतरी गेलंय म्हणून. जो माणूस स्वखर्चाने गावात व्यसनमुक्ती अभियान राबवितो आणि पॅनलचं नावदेखील जनसेवा ठेवतो तो माणूस खरंच वाईट असू शकत नाही. अशा माणसाची निर्घृण, अमानवीय हत्या झाली आणि न्यायासाठी कुटुंब वणवण फिरतंय. आक्रोश मोर्चात मान खाली घालून डोळ्यातल्या पाण्याला वाट मोकळी करून देतंय. आरोपी मात्र ताठ मानेने पोलिसांसोबत कोर्टात येतात आणि जातात. वैभवी इ. १२ वी मधील विद्यार्थीनी. परिक्षा अगदी १५ दिवसांवर आली असताना, बापाच्या न्यायासाठी झगडते आहे. हे सर्वच लक्षात घेता सरकारच लक्ष कुठे आहे? म्हणण्याची वेळ आली. सुरेश आण्णांनी सांगितल्याप्रमाणे गुन्हेगार हे बऱ्याच गुन्हयांमधील पचनी पडलेले आरोपी आहेत. प्रोडक्शन हाऊस बंद केल्याशिवाय प्रोडक्शन कसे थांबणार? फडणवीस साहेब. २०२३ कलम १४० नुसार खंडणीसाठी अपहरण, कलम ३६४ नुसार अपहरण करून मृत्यूस कारण, कलम ३०७ नुसार हत्येचा प्रयत्न, कलम ३०२ नुसार हत्या / खून करणे तथा संघटित गुन्हेगारी आदि गुन्हे अजामिनपात्र दाखल करून आरोपींना फाशीचीच शिक्षा द्यावी ही सरकारकडे विनंती. अथवा दुसरा संतोष देशमुख व्हायला वेळ लागणार नाही. मग तो कोणत्याही जातीचा असो.

**सौ.सायली तान्हाजी हंबर्डे**
मो. ९९६०५१३७७७,९०२११९४२९४

## ज्या दिवशी हिंदुस्थानात पहिला वृध्दाश्रम सुरु झाला त्यादिवशी धरणीमाय थरथर कापली असेल-ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

आष्टी । प्रतिनिधी

**केवळ शिक्षण घेतल्यामुळे सुशिक्षित मिळवणारे स्वतःच्या सुखासाठी आपल्या जन्मदात्या वयोवृद्ध आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवणारे,चांगली आर्थिक परिस्थिती असणारे उच्चपदस्थ अधिकारी यांच्यापेक्षा दुष्काळात निसर्गाशी झगडून देखील कष्ट करणारा शेतकरी वर्ग आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवत नाही. शेतकरीच खरा श्रीमंत आहे कारण तो आई वडीलांना वृध्दाश्रमात पाठवत नाही.ज्या देशात प्रभु रामचंद्र सावत्र मातेच्या आदेशाने वनवासात गेला त्याच देशात आज काय चित्र आहे?ज्या दिवशी हिंदुस्थानात पहिला वृध्दाश्रम सुरु झाला त्यादिवशी धरणीमाय थरथर कापली असेल असे प्रतिपादन संत मदन महाराज बिहाणी देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांनी केले.**

आष्टी येथील संत वामनभाऊ, संत भगवानबाबा यांच्या मंदिरात आयोजित पंचदिनी सप्ताहात हरिकीर्तन प्रसंगी ते बोलत होते. आष्टी शहरातील संत वामनभाऊ, संत भगवानबाबा प्रतिष्ठानाचेवतीने पंचदिनी कीर्तन महोत्सव अखंड हरिनाम सप्ताह झाला.साधु, संतांच्या कृपाशीर्वादाने दि.१४ ते दि.१८ जानेवारी या कालावधीत पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताह झाला. या सप्ताहात ह.भ.प.धर्माचार्य आदिनाथ महाराज आंधळे, विनोदाचार्य ह.भ.प.भरत महाराज जोगी, ह.भ.प.सोमनाथ महाराज कराळे, संत मदन महाराज बिहाणी देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांचे कीर्तन झाले.शनिवारी जानेवारी रोजी संतकृपा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. ब्रम्हचैतन्य महाराज तावरे यांचे सकाळी ९ ते ११ यावेळात काल्याचे किर्तन झाले. ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल पुढे म्हणाले की,संत हेच समाजाचे सर्वश्रेष्ठ गुरु असतात.संत हे देव आणि समाजामध्ये दुवा निर्माण करतात. मुले असावेत तर ते चांगली मुले आहेत असे म्हणण्याच्या लायकीचे असावेत. अन्यथा मुले नसले तरी चालतील अशी परिस्थिती आहे आपल्याला प्रभू रामचंद्र सारखे दैवत हे अत्यंत आदर्श असून सावत्र आईच्या आदेशावरून आनंदाने वनवासात गेले आहेत.प्रभू श्री रामचंद्र हे मातेच्या आज्ञेनुसार वनवासात गेले आहेत परंतु आज त्यांच्याच भूमीमध्ये भारत देशामध्ये वृध्दाश्रम उभारले जात आहेत. वृध्दाश्रम सुरु करावे लागणे हे हिंदुस्थान देशासाठी भुषण नसून दूषण आहे त्यामध्ये आणखी दुःखद बाब अशी आहे की या वृद्धाश्रमामध्ये सुखवस्तू कुटुंबातील असलेल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचेच आई वडील यांना ठेवले जात आहे आहेत मात्र सतत दुष्काळाच्या छायेत असून देखील काळ्यामातीत राबणा-या शेतकऱ्यांचे माता पिता वृध्दाश्रमात पाठवले जात नाहीत.हे तपासून पाहा त्यामुळे शेतकरीच खरे श्रीमंत आहेत आहेत असे सांगत ज्या घरातील वयोवृद्ध आई-वडील वृद्धाश्रमात जात आहेत त्यांची मुले आपल्या मुलांना कोणत्या पद्धतीचे संस्कार करणार आहेत कदाचित अशा प्रकारचे संस्कार कमी पडल्यास त्यांची मुले आपल्या आई वडील यांना वृद्धापकाळ मध्ये वृद्धाश्रमात पाठविण्याची शक्यता जास्त आहे अशा प्रकारे धोका ओळखून समाजातील सुशिक्षित मिळवणाऱ्या व्यक्तींनी आपापल्या आई-वडिलांना वृध्दाश्रमात पाठवू नये. उलट परमेश्वरा इतकीच सेवा आपल्या आई-वडिलांची करावी याबाबत अत्यंत परिणामकारक आणि सुंदर असे समाज व्यवस्थेचे वर्णन करताना ते पुढे म्हणाले की, संसारातील गोष्टींनी कोणाचीही तृप्ती होत नसते संसार सुखाचे मागे जाऊनही मानव अखेर अतृप्तच राहत असतो आपण श्रीकृष्णाच्या चरित्राचे उच्चारण करतो मात्र व्यवहारात आणि आचरणात मात्र विसंगती आढळून येते कृष्णाच्या चरित्रातील दही दुधाची चोरी या गोष्टीतून त्यांनी अध्यात्मकारण, भक्तीकारण,समाजकारण आणि राजकारण ही चारही कारणे होती त्याचा शोध आपण सर्वांनी घेण्याची आवश्यकता आहे असेही त्यांनी शेवटी सांगितले.शनिवारी सकाळी ९ ते ११ यावेळात ह.भ.प. ब्रम्हचैतन्य तावरे महाराज यांचे काल्याचे कीर्तन झाले.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते स्वामित्व योजनेंतर्गत प्रॉपर्टी कार्डचे वितरण बीडमध्ये ना.पंकजाताई मुंडे राज्य सरकारच्या वतीने प्रमुख अतिथी

## स्वामित्व योजनेची वीट ना.पंकजाताईंच्या कार्यकाळात रचली हे जिल्ह्यासाठी भूषणावह-जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशंसा





बीड । प्रतिनिधी

**केंद्र व राज्य सरकारचा संयुक्त उपक्रम असलेल्या स्वामित्व योजनेंतर्गत पात्र घरमालकांना मालमत्ता कार्डचे वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ऑनलाईन पध्दतीने झाले. बीडमध्ये राज्य सरकारच्या वतीने राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे प्रमुख अतिथी म्हणून ऑनलाईन उपस्थित होत्या. दरम्यान ना. पंकजाताई मुंडे ग्रामविकास मंत्री असताना या योजनेची वीट रचली गेली होती, आता तिचा कळस झाला आहे,ही संपूर्ण जिल्हयासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे अशा शब्दांत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांची प्रशंसा केली.**

गावातील मिळकतींचे जीआयएस सर्वेक्षण व ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करून घरमालकांना मालमत्ता कार्ड व ई- सनदचे वितरण या योजनेंतर्गत केले जाते. ही योजना सन २०१९ मध्ये ना. पंकजाताई मुंडे ग्रामविकास मंत्री असताना महाराष्ट्रात आखली गेली होती, त्यानंतर संपूर्ण देशभरात योजना लागू झाली,त्याचे रितसर उदघाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २४ एप्रिल २०२० रोजी केले होते. आज या योजनेंतर्गत मालमत्ता कार्डचे वितरण पंतप्रधानांनी ऑनलाईन पध्दतीने केले.बीडच्या कार्यक्रमासाठी ना. पंकजाताई मुंडे हया राज्य सरकारच्या वतीने प्रमुख अतिथी म्हणून ऑनलाईन उपस्थित होत्या. पंतप्रधानांचा कार्यक्रम होण्यापूर्वी सकाळी ११.३० वा. त्यांच्या उपस्थितीत योजनेचा प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मनोगत करताना त्या म्हणाल्या, प्रॉपर्टी कार्डची संकल्पना योजना मी मंत्री असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कॅबिनेट मध्ये मांडली होती. तेव्हा पंतप्रधान मोदींना आम्ही सादरीकरणही केले होते, आपल्या गावात जमीन व प्रॉपर्टीचे खूप तंटे असतात, ते कायमस्वरूपी सोडविण्यासाठी ही योजना खूप महत्वाची आहे. पंतप्रधान मोदींनी या योजनेला स्वामित्व हे खूप चांगले नाव दिले आणि यात जिवंतपणा आणला आहे. ही योजना त्यांनी आता देशभरात लागू केली आहे. या योजनेची सुरवात आपल्या जिल्ह्याने सुरू केली ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. सर्व सामान्य लोकांसाठी मोदी खूप चांगल्या संकल्पना आणतात, त्याचाच हा भाग आहे. ही योजना उत्तर प्रदेशने खूप चांगल्या प्रकारे राबवली आहे, त्यापेक्षा काकणभर काम महाराष्ट्राला करायचे आहे असं ना. पंकजाताई म्हणाल्या. ना. पंकजाताई सन २०१९ मध्ये ग्रामविकास मंत्री असताना ह्या योजनेची संकल्पना पुढे आली होती, आज या योजनेने मूर्त स्वरूप धारण केले आहे. ही आपल्या जिल्ह्यासाठी भूषणावह बाब आहे. ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासी कळस..असं म्हटलं तर वावग ठरणार नाही अशा शब्दांत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी ना. पंकजाताईंनी केलेल्या कामाची प्रशंसा केली. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी पाठक यांचेसह निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे आदी अधिकारी व पात्र लाभार्थी उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमानंतर ना. पंकजाताई पंतप्रधान मोदी यांच्या कार्यक्रमात ऑनलाईन सहभाग घेऊन त्यांचे मार्गदर्शन ऐकले.

## पान १ वरून...

### शेतकरी कर्जमाफीत

तसेच वर्षाला किमान ४२ हजार कोटी रुपये खर्च येतो. आश्वासन दिल्याप्रमाणे २१०० रुपये दिल्यास ६० हजार कोटी रुपयांचा ताण येणार आहे. लाडक्या बहीण योजनेचा एवढा ताण आल्याने सरकार कर्जमाफीला बगल देत असल्याची चर्चा आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठीही ६० ते ७० हजार कोटींच्या दरम्यान निधी लागेल. आता लाडकी बहीण योजना आणि कर्जमाफी या जास्त खर्चाच्या योजना तिजोराती खडखडाट असताना सरकार देऊ शकत नाही. त्यामुळे सरकार कर्जमाफीवर बोलत नाही. तसेच तजवीज झाल्याशिवाय कर्जमाफी मिळू शकणार नाही.

----------

### राख विक्रीच्या कंपनीत

असे असताना मंत्रीच या कंपनीच्या माध्यमातून आर्थिक लाभ कसा मिळवू शकतो असा सवाल अंजली दमानिया यांनी केला आहे. पुढे बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या की, हा ऑफिस ऑफ प्रॉफिट या कायद्याचा भंग होत आहे. तसेच ते या कंपनीतील लाभार्थी असल्याने मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा तात्काळ घ्यावा अशी मागणीही राज्य सरकारकडे त्यांनी केली आहे. अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांनी डिसीसी बँकेच्या घोटाळ्यात जगमित्र स्पिनिंग मिल प्रकरणी जामीन मिळविण्यासाठी धनंजय मुंडे यांचे वकील म्हणून ज्येष्ठ सरकारी वकील उज्जव निकम यांचे सुपुत्र अनिकेत निकम हे होते. आता या प्रकरणात सरकारी वकिल म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्त करण्याची मागणी होत असल्याचा मुद्दाही उपस्थित केला आहे. त्याशिवाय पुढे आणखी एका एक्सवरील ट्विटमध्ये अंजली दमानिया यांनी गौप्यस्फोट करत म्हणाल्या की, वाल्मिक कराड याच्या विरोधात एफआयआर होईपर्यंत पोलिसांचे संरक्षण पुरविण्यात आले होते. त्यामुळे सराईत गुन्हेगाराला सरकारी अंगरक्षक पुरविण्यावरून कराडच्या जीविताला इतरांकडून धोका होता हे बुद्धीला पटण्यासारखे आहे का असा सवालही यावेळी त्यांनी उपस्थित केला.

------------

### धनंजय मुंडेंचा पत्ता कट!

पालकमंत्रीपदाची जबाबदारी अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद असणार आहे. चंद्रकांत पाटील यांच्याकडे सांगलीचे पालकमंत्रीपद असणार आहे. पंकजा मुंडे यांच्याकडे जालन्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले आहे. गुलाबराव पाटील हे जळगावचे पालकमंत्रि असणार आहेत.

---------

### हॉल तिकिटावर जातीचा उल्लेख;

लक्ष द्यायला पाहिजे. जसे की आपण शिर्डीला साईबाबांच्या दर्शनाला आल्यावर जात-धर्म विसरून दर्शन घेत असतो, त्याप्रमाणे रोजच्या व्यवहारात आणि सरकारी व्यवहारात त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी बोलताना दिली आहे. तर काँग्रेस नेते नाना पटोले यांनी देखील या प्रकरणावरून सरकारवर आणि शिक्षण विभागावर निशाणा साधला आहे. सरकारच्या कामकाजावर प्रश्न निर्माण होत आहे. शाळेत प्रवेश घेत असताना कागदपत्रांवर या सगळ्या बाबींचा उल्लेख असतो त्यावरच त्यांचे शिक्षण होते. या पद्धतीने छोट्या जातीचे लोक कोण आहेत? उच्च वर्णीय कोण आहेत? या आधारावर सरकारला परीक्षा घ्यायच्या असतील. त्यातून कमी जातीच्या मुलींना नापास करता येईल का? हा प्रयोग होऊ शकतो, असे ते म्हणाले. बोर्डामध्ये असे लोक कशाला ठेवता? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच बोर्डाने दिलेल्या स्पष्टीकरणावर बोलताना पटोले म्हणाले की, बोर्ड असे उत्तर देत असेल, तर हे चुकीचे आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात हे कधी झाले नाही. जातिवादी सरकार महाराष्ट्रात आल्याने त्यांना तुकडे पाडायचे असल्याने विद्यार्थ्यांमध्ये हा प्रयोग करत आहे का अशी शंका मनात आहे. नवीन पिढीच्या विद्यार्थ्यांना जात आणि त्या पलीकडे जाऊन शिक्षण घेण्याची सवय झाली आहे. यांच्यातच भेद पाडायचे हे सरकारचे कृत्य असले पाहिजे अशी आमच्या मनात शंका आहे, असे ते म्हणाले.

----------

### अजितदादांच्या राष्ट्रवादीचा

पटेल, खासदार सुनील तटकरे, राष्ट्रवादी ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासह राज्यभरात प्रमुख नेतेमंडळी शिर्डीत दाखल झाले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत या अधिवेशनात विचारमंथन केले जात आहे. या अधिवेशनादरम्यान माध्यमांशी बोलताना प्रफुल्ल पटेल आणि दिलीप वळसे पाटील यांनी केलेल्या वक्तव्यांनी सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. खासदार प्रफुल्ल पटेल म्हणाले की, अधिवेशनात पक्षाचे ध्येय-धोरण याबाबत चर्चा होईल. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांची विचारधारा घेऊन आम्ही पुढे जात आहोत. स्थानिक स्वराज्य संस्था वेगळ्या आहेत. जिथे महायुती करू शकतो तिथे होईल. मात्र, जिथे नसेल तिथे वेगळा विचार होऊ शकतो. निवडणुकांनंतर पुन्हा महायुती म्हणून कसे एकत्र येता येईल, याबाबत अधिवेशनात चर्चा होईल. ज्या जिल्ह्यात आमचे आमदार, खासदार नाहीत. तिथले देखील लोक इथे आले आहेत. मुंबई महापालिकेत प्रत्येक वॉर्डात आमचे कार्यकर्ते आहेत. तिथे त्यांना ताकद देऊ आणि जिथे महायुती म्हणून जाणे शक्य आहे, तिथे एकत्र राहू, असे त्यांनी म्हटले आहे. तर दिलीप वळसे पाटील म्हणाले की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुती एकत्र लढली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वतंत्र लढायला देखील तयार आहे. या नेत्यांनी स्वबळाची भाषा करीत भाजपाला परखड इशारा दिला आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. १९ जानेवारी २०२५


# दुहेरी हत्याकांडातील आठ आरोपी अटक

आष्टी । प्रतिनिधी

दुहेरी हत्याकांडातील आठ आरोपींना अवघ्या काही तासांत जेरबंद करून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिवाचे रान करून प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेऊन केलेल्या कामगिरीचे पोलीस अधीक्षक यांनी पोलीस ठाण्याला भेट देऊन विशेष कौतुक केले असून लवकरच प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत गुरूवारी रात्रीच्या दरम्यान दुहेरी हत्याकांड झाल्याची घटना घडली होती.या घटनेतील आठ आरोपींना ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे व त्याच्या टीमने मोठ्या शिताफीने पाठलाग करून अटक केली.कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ न देता प्रकरण व्यवस्थित हातळल्याने बीडचे पोलीस अधीक्षक नवनवीन कॉवत यांनी शनिवारी दुपारी अंभोरा पोलिस ठाण्याला भेट देऊन विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व पोलिसांचे कौतुक केले.त्याच बरोबर लवकरच प्रशस्तीपत्र देण्यात येणार असल्याचे सांगितले.

# सोने लुटणारे ४ आरोपी पकडले चार लाखांचा मुद्देमाल जप्त

जालना । प्रतिनिधी

सोने लुटल्याप्रकरणी चार आरोपींना जेरबंद करुन त्यांच्या ताव्यातुन गुन्हयातील रोख रक्कम व सोन्याच्या दागिने असा रु. ४,००,०१५/- रुपयांचा मुददेमाल जप्त सदरची कारवाई

स्थानिक गुन्हे शाखेने केली. तत्काळ तपास कारण या संदर्भात पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी दिले होते आदेश दिनांक १५/०१/२०२५ रोजी १८:०० वाजेच्या सुमारास अज्ञात आरोपीतांनी फिर्यादी नामे सचिन सुरेश खर्डेकर, वय-५० वर्ष, रा. गोपालपुरा, जालना यांना सिंधी काळेगाव समोरील रस्त्यावर मोटार सायकलवरुन खाली पाडुन त्यांच्या ताब्यातील रु.४,७५,०००/- किमतीचे सोन्याचे दागिने व रु.५५,०००/- रोख रक्कम असा मुददेमाल असलेली काळी बॅग हिसकावून घेवुन गेल्याची घटना घडल्याने फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन तालुका पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानुषंगाने मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल साहेब यांनी गुन्हा उघडकीस आणणेबाबत पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने पथके स्थापन करुन गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरची जबरी चोरी ही आरोपी गणेश शेजुळ रा. वाल्मिकनगर, जालना यांने त्यांच्या साथीदारांच्या मदतीने केली आहे.

दिनांक १८/०१/२०२५ रोजी सदर माहितीच्या अनुषंगाने गणेश महादेव शेजुळ, बय-२२ वर्ष, रा. वाल्मिकनगर, जालना यास ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली देवून सदरचा गुन्हा त्याने व त्याचे साथीदार न विशाल अजयसिंग राजपुत, वय-२० वर्ष, रा.लोधीमोहल्ला, जालना ३) जयेश किशोर राजपुत वय २२ वर्ष रा. गांधीनगर, जालना ४) अभिजित राजेश पवार, वय-२२ वर्ष, रा. रामनगर, जालना यांच्या मदतीने केला असल्याची कबुली देवुन गुन्हयातील जबरी चोरी केलेला मुददेमाल रु.३,७२,०१५/- रुपये किंमतीचे विविध वर्णनाचे सोन्याचे दागिने व रु.१५०००/- रोख रक्कम व रु.१५०००/- किंमतीचा आरोपीने गुन्हयात वापरलेला मोबाईल असा एकुण रु.४,००,०१५/- किंमतीचा मुददेमाल काढून दिला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल ,उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. सुरेश उनवणे, सपोनि, योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पव्हरे, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, भाऊराव गायके, गोपाल गोशिक, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर, गणपत पवार, ईरशाद पटेल, सतिष श्रीवास, देविदास भोजने, रमेश काळे, संदीप चिंचोले, कैलास चेके सर्व स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे.



# सॉफ्ट वर्ल्ड कंप्युटर सारथीच्या वतीने प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग

अंबड । प्रतिनिधी

सारथी पुणे आणि घनसावंगी तालुक्यातील सॉफ्ट वर्ल्ड कंप्युटर यांच्या संयुक्त विद्यमाने १३ जानेवारी रोजी जिजाऊ जन्मस्थळ व जिजाऊ सृष्टीची साफसफाई करण्यात आली.

राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त १२ जानेवारी रोजी लाखो जिजाऊ भक्त नतमस्तक होण्यासाठी शहरात येतात. मोठ्या संख्येने जनसमुदाय असल्याने स्थानिक प्रशासन व्यवस्थेवर ताण येतो. या दरम्यान सर्वत्र पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, अन्य प्लास्टिक साहित्य, कागद असा कचरा जिजाऊ जन्मस्थळ, जिजाऊ सृष्टी तसेच शहरात पसरतो. त्याची साफसफाई होण्यास अधिक परिश्रम व वेळ लागतो. ही बाब लक्षात घेऊन सारथी पुणे व सॉफ्ट वर्ल्ड कंप्युटर यांच्या संयुक्त विद्यमानाने सिंदखेड राजा येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. त्यांच्यासोबत छत्रपती संभाजी महाराज युवा व्यक्तिमत्व कौशल्य विकास कार्यक्रम सारथी पुणे यांच्या वतीने जिजाऊ जन्मोत्सवा निमित्त सिंदखेड राजा येथे स्वच्छता अभियानाचे कार्य संपन्न झाले. यामध्ये सॉफ्ट वर्ल्ड कंप्युटर येथील सारथीमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी केलेल्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# विद्यार्थी खेळातून मैत्रीची व सांघिक भावना वाढीस लागते -गोंटे

अंबड । प्रतिनिधी

खेळातून शारीरिक सुदृढता, व्यायाम,कसरत व निरोगी आरोग्यासाठी मैदानी खेळ जीवनात महत्वाचे आहे. खेळातून मैत्रीची व सांघिक भावना वाढीस लागते. खेळातून खेळाडूचा आनंद खऱ्या अर्थाने द्विगुणित होतो.असे प्रतिपादन बाबासाहेब गोंटे यांनी अंबड शहरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गुरूवारी (ता.१६) क्रिडा स्पर्धेच्या उदघाटना प्रसंगी बोलताना केले. याप्रसंगी कार्यक्रमाला रोकडोबा डोईजड, संतोष दह्याळकर, एस.ए.भोजने, बी.डी.नागरे,के.



मगर, एस.व्ही.पुपले, एन.बी.चौधरी, व्ही.आर.घोडके, वाय.एच.आठवले, एस.व्ही.गायकवाड, एस.एम.मतकर, एन.पी.वैद्यसह आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना बाबासाहेब गोंटे म्हणाले की, खेळात हार,जित होत असते. खेळातून खेळाडूना आपल्या कलागुणांना वाव देता आला पाहिजे. खेळातून मिळणारे मनस्वी समाधान व आनंद मिळवून देणारा असतो.असे हि शेवटी गोंटे यांनी बोलताना टवसांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दत्तात्रय चौधरी यांनी तर आभारप्रदर्शन एस.ए.इंगळे मानले.

# श्री गणेश विद्या मंदिर शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर येथील श्री गणेश विद्यामंदिर ,शाळेची तीनदिवसीय शैक्षणिक सहल दि.१५,१६ व १७ जानेवारी रोजी यशस्वीरित्या पार पडली. सहली दरम्यान विद्यार्थ्यांना सर्वप्रथम सातारा येथील रयत शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यालय तसेच कर्मवीर समाधी परिसराचे दर्शन घडविण्यात आले.त्यानंतर कोल्हापूरजवळील कणेरी मठ-त्यामधील म्युझियम,मायामहल,तारांगण व दिव्यगार्डन इ. गोष्टी,नंतर कोल्हापूर येथील श्री महालक्ष्मीदेवी मंदिर, शाहू पॅलेस, रंकाळा तलाव, रत्नागिरी जिल्ह्यातील श्रीक्षेत्र नाणीजधाम, थिबा पॅलेस, रत्नदुर्ग किल्ला,श्री देवी भगवती मंदिर,सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्रातील सुमारे १३०० समुद्री जीवांचे नमुने व २५० शिंपल्यांचे विविध प्रकार असलेले मत्स्यालय,आरेवारे बीच, गणपतीपुळे येथील स्वयंभू गणेश मंदिर,सुंदर समुद्रकिनारा,किल्ले प्रतापगड,महाबळेश्वर येथील महाबळेश्वर मंदिर,पंचगंगा मंदिर,वेण्णा लेक,सनसेट पाईंट व मार्केट इ. प्रेक्षणीय स्थळे दाखवण्यात आली. सहली दरम्यान विद्यार्थ्यांना कोकणातील जांभा खडकातील उतरत्या छपरांची घरे, भातशेतीची खाचरे, आंबा-काजू- सुपारी, नारळी-पोफळीच्या बागा, वनस्पतींचे विविध प्रकार, कोकणी मेवा, विविध कोकणी खाद्यपदार्थ व पेये,स्ट्राबेरीची शेती, कोकणातील नद्या,घाटरस्ते तसेच कोकणी लोकजीवनाविषयी माहिती मिळाली. सहलीचे नियोजन विद्यालयाचे सहल विभागप्रमुख एस सी पठाण यांनी केले.सहलीमध्ये डूचे सी एस,सानप आर बी,खलाटे आर. डी., श्रीमती मेढे एच एम, श्रीमती पंडागळे जे टी, श्रीमती आंधळे एस बी,सौ सुळे जे पी



व ८३ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. सहलीच्या नियोजनासाठी विद्यालयाचे पर्यवेक्षक जाधवर एफ एस,जेष्ठ शिक्षक उढाणे पी एस, काळे एस बी,काकडे ए ए, दहिफळे ए एस, गाडीलोहार एम एस, सदावर्ते ए बी, केंद्रे ए एच,भांगे आर एस, लेखनिक श्री हुलगुंडे ए जे, आव्हाड पी एस, मोरे बी जे, पोकळे ए एम यांनी परिश्रम घेतले. सहलीच्या सुरक्षित व यशस्वी आयोजना निमित्त विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक आर एम हाके यांनी सहल विभागप्रमुख तसेच सर्व सहभागी शिक्षकांचे तसेच पाटोदा आगाराचे बसचालक अनंता राख व ए जे मिसाळ यांचे आभार मानले.

# सेलू येथील राज्यस्तरीय पत्रकार मेळाव्याची तयारी युद्धपातळीवर सुरू-स्वागताध्यक्ष विनोद बोराडे

**सेलू । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय तालुका पत्रकार संघ अध्यक्ष मेळावा व आदर्श तालुका पत्रकार पुरस्कार वितरण सोहळा ची तयारी युद्ध पातळीवर सुरू असून सेलू शहर राज्यातून येणाऱ्या पत्रकारांच्या स्वागतासाठी सज्ज असल्याची माहिती या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष विनोद यांनी दिली आहे.

मराठी पत्रकार परिषद मुंबई यांच्या वतीने दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी सेलू येथील साई नाट्यमंदिरात राज्यातील २५६ तालुक्यातील तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष यांचा राज्यस्तरीय मेळावा तसेच राज्यात आदर्श काम करणाऱ्या तालुका व जिल्हा पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होत आहे. या मेळाव्याच्या स्वागताध्यक्षपदी माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांची निवड झाली असून त्यांनी या मेळाव्याच्या तयारीचा आढावा घेतला आहे. साई नाट्य मंदिर येथे सहाशे पत्रकार यांची बैठक व्यवस्था असून पत्रकारांची निवास व्यवस्था बालाजी मंदिर सेलू येथे करण्यात आली आहे. या मेळाव्याच्या तयारीवर माझी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांचे लक्ष असून याबाबत ते रोज आढावा घेत आहेत. सभागृह आणि निवासव्यवस्था यांचे नियोजन झाले आहे. कार्यक्रमासाठी लागणाऱ्या इतर बाबींची पूर्तता करण्यात येत आहे. मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सेलू शहरातील सेलू तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष लक्ष्मण बागल, जिल्हादयक्ष प्रभू दिपके, लक्ष्मण मानोलीकर, राजू हट्टेकर, जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास, कांचन कोरडे, मोहसिन अहमद, सतीश आकात, निरज लोया,निसार पठाण हे दररोज तयारीचा आढावा घेत आहेत. मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे हे दररोज सेलू पत्रकार संघाच्या संपर्कात आहेत. सेलू शहर हे एक सांस्कृतिक आणि शैक्षणिक नगरी असल्याने या भागातील नागरिक तसेच सर्व राजकीय प्रतिनिधी राज्यभरातून पत्रकारांच्या स्वागतासाठी इच्छुक असल्याचे माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांनी यावेळी बोलून दाखवले.

# जिल्हा परिषद मुख्य इमारतीसह सर्व विभागात स्वच्छतेसाठी श्रमदान

**बीड । प्रतिनिधी**

विकासाचे शंभर दिवस या उपक्रमानिमित्ताने जिल्ह्यात सर्व विभाग दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध झाले असून त्याचाच एक भाग म्हणून आज जिल्हा परिषद मुख्य इमारतीसह सर्व विभागात स्वच्छतेसाठी श्रमदान आयोजित करण्यात आले. प्रत्येक विभागातील विभाग प्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी आपला परिसर मात्र आज चकाचक करून मोहीम यशस्वी केली.

मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतील शंभर दिवस विकासाचे या उपक्रमात आज जिल्हा परिषदेतील सतरा विभाग सहभागी झाले होते प्रत्येक विभागाने आपले कर्मचारी व विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीमध्ये परिसराची अतिशय बारकाईने स्वच्छता केली.

सकाळी साडेसात ते साडेनऊ या कालावधीत कर्मचाऱ्यांनी परिसरातील झाडांचा पालापाचोळा कॅरीबॅग तसेच कागदाचे खपट व अस्ताव्यस्त



वाढलेली झाडे आणि गवत काढून परिसर चकाचक केला. जिल्हा परिषदेच्या परिसरामध्ये साडेसात वाजता सर्व कर्मचारी उपस्थित झाल्यानंतर श्रमदानास प्रारंभ झाला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दोन तासासाठी लोखंडी गेट बंद केले आणि सर्व कर्मचाऱ्यांनी साफसफाई केल्याशिवाय परत जायचं नाही हा आदेश दिल्यामुळे सर्वच कर्मचारी झाडून श्रमदानात उतरली. स्वच्छतेसाठी दोन तास ही मोहीम यापुढे देखील सुरू ठेवण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिले आहेत.श्रमदान करण्यासाठी स्वतः मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. श्रमदानात उपस्थित असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची नोंद देखील सामान्य प्रशासन विभागाने घेतल्याची माहिती विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रदीप काकडे यांनी सांगितले आहे.

पान ६ वरून...

## दर रविवारी कुषी दुकाने

कशाचा का असेना. शेतकऱ्यांना तरी वापसा मोडला म्हणून का होईना सुट्टी मिळते पण व्यापाऱ्याचा मात्र कधीच वापसा मोडत नाही. नोकरदारांना पण आठवड्याला सुट्टी मिळते.ते लोकं सुट्टी दिवशी स्वत:ला वेळ देतात,कुटुंबाला वेळ देतात.काही आवडी-निवडी चे कामं करतात या धावपळीच्या जिवनातून एक दिवस का होईना पण ते रिलॅक्स होतात. त्यामुळे एक दिवस सुट्टीचा निर्णय सर्व कृषी व्यापाऱ्यांनी घेतला आहे.वडवणी तालुक्यातील सर्व ग्रामीण मधील व शहरांमधील दुकानदारांनी आप-आपली कृषी दुकान प्रत्येक रविवारी बंद ठेऊन वडवणी तालुका कृषी असोसिएशन ला सहकार्य करावे असे आव्हान वडवणी तालुका कृषी असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे

## शेतीकडे व्यावसायिक

पाटील होत्या. पुढे पवार यांनी शेतीवर आधारित असलेल्या व्यवसायाबाबत विविध उदाहरणे देवून मार्गदर्शन केले. त्यांनी शेतीकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून पहावे. जोडधंदा करण्यासाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांची त्यांनी माहिती दिली. डॉ.अरूंधती पाटील यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या समन्वयक डॉ.रमा पांडे यांनी केले संचलन मायावती बनसोडे तर उपस्थितांचे आभार डॉ.हनुमंत साळुंके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक

सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन करून १००% निकालाची व संस्थेच्या यशाची परंपरा कायम ठेवली. परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी ,अध्यक्ष भूषण मोदी ,कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक प्रा. वसंत चव्हाण, डॉक्टर डी .एच .थोरात तसेच शाळेचे मुख्याध्यापक विनायक मुंजे यांच्यासह संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवानी अभिनंदन केले आहे.

## सात गावाचा लाईट सुरळीत

बदललेल्या नाहीत दर रोज लाईट फॉल्ट होत आहेत सात गावांनी पाठपुरावा करून ५ चा नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर होऊन हि बसवला जात नाही तो तत्काळ बसवण्यात यावा व सात गावाचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा या मागणी साठी अधीक्षक अभियंता महावितरण जालना रोड येथे निवेदन देण्यात आले नवीन मंजूर ट्रान्सफॉर्मर बसवण्यात यावा, जुन्या तारा बदलून नवीन तारा बसावा, शेतकऱ्यांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा करण्यात यावा अन्यथा सात गावातील शेतकऱ्यांना सह नागरिक तीव्र आंदोलन करतील असा इशारा शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, दीपक आमटे, प्रवीण आमटे, तेजस आमटे, चेतन आमटे, जालिंदर सोळुंके, श्रीराम खुरणे, प्रवीण शिंदे, आकाश टेकाळे, खाजा भाई पठाण, यांच्या वतीने निवेदन देऊन इशारा देण्यात आला आहे.

## युवकांनी सामाजिक माध्यमाचा

मार्गदर्शन केले आपला देश हा शेतीप्रधान देश आहे परंतु सध्याच्या काळात शेती व्यवसाय करीत असताना उत्पन्नापेक्षा शेतीवरचा खर्च हा वाढलेला आहे त्यामुळे शेती आणि उत्पन्न याचा समतोल साधण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वकष्टाबरोबर सामाजिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केली पाहिजे बदलते पर्यावरण बदलते हवामान या सर्व गोष्टीचा विचार करून शेती व्यवसाय पुढे नेला पाहिजे असे आव्हान शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे आभार स्वयंसेवक अभिषेक वार भवन यांनी मांडले या कार्यक्रमासाठी शेख तोफिक अनुजा जाधव पायल मुळे यांनी सहकार्य केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री कुणाल काळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मिशन जरेवाडी सर्व शाळांसाठी नवसंजिवनी ठरणार - गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे

**वडवणी । प्रतिनिधी**

आपल्या बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रातील जरेवाडी पॅटर्नचा संपूर्ण राज्यात गौरव केला जातो. आता हाच पॅटर्न बीड जिल्हा परिषदेच्या वतीने संपूर्ण बीड जिल्ह्यातील शाळांमध्ये राबविला जाणार आहे. या अभियानातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचे ध्येय आपणांस साध्य करण्यात येणार आहे. मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान हा निपूण भारत अभियानांतर्गत एक पूरक उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी बीड जिल्हा परिषदेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. या अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणींचे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यामुळे निश्चितपणे मिशन जरेवाडी हे अभियान सर्वच शाळांसाठी एकप्रकारे नवसंजिवनीच ठरणार असल्याचे प्रतिपादन वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी व्यक्त केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील लोकमान्य टिळक महाविद्यालय याठिकाणी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या संकल्पनेतून सुरु केलेला मिशन जरेवाडी या शालेय गुणवत्ता विकास अभियान या उपक्रमाचा शुभारंभ काल दि.१७ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी वडवणी पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी पोहनेरकर साहेब, गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे उपप्राचार्य कुलकर्णी सर, प्रा.सचिदानंद तांदळे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर, वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, कन्या वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सैलानी शेख सर, पिंपरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश धायतिडक सर, चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख पवनराजे देशमुख सर, काडीवडगांव केंद्राचे केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे सर, देवळा केंद्राचे केंद्रप्रमुख निलेश चव्हाण सर, यांसह सर्व केंद्रिय मुख्याध्यापक, सर्व जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक, सर्व साधन व्यक्ती, विषय तज्ञ, व गटसाधन केंद्रातील सर्व कर्मचारी वृंद



## वडवणी तालुक्यात मिशन जरेवाडी अभियानाचा प्रारंभ

मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना सहाय्यक गटविकास अधिकारी पोहनेरकर साहेब म्हणाले की, बीड जिल्हा परिषदेच्या वतीने अतिशय सुंदर असा सुरु करण्यात आलेला मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान हा उपक्रम संपूर्ण वडवणी तालुक्यातील शाळांमध्ये अतिशय सुक्ष्मपणे राबविण्यात यावा व हा उपक्रम सर्वांनी यशस्वी करावा असे आवाहन त्यांनी केले. तसेच यावेळी पुढे बोलतांना गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे म्हणाले की, मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान हा निपुण भारत अभियानांतर्गत एक पूरक उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी बीड जिल्हा परिषदेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. या अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणीचे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शिक्षक, विद्यार्थी आणि समाज यांनी एकसंघपणे कार्य केल्यास एक उत्कृष्ट शाळा कशी घडते याचे उदाहरण आपणांस आपल्याच जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील जरेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेने दाखवून दिलेले आहे. दूर्गम भागातील शाळा असूनही अनेक समस्यांवर मात करत गेल्या अनेक वर्षांपासून शाळेत सुरु असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम आणि त्याचे फलित म्हणून वाढलेली पटसंख्या आणि गुणवत्ता वाढ या सर्वांची प्रेरणा घेवून बीड जिल्ह्यातील सर्व शाळा जरेवाडी सारखे मॉडेल म्हणून विकसित व्हाव्यात या उद्देशानेच या अभियानास मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान असे नाव देण्यात आलेले आहे. शिक्षण विभागातील कार्य करणारे सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रिय मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी या सर्वांनी या गुणवत्ता विकास अभियान चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेवून वडवणी तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्तेची संपादनूक पातळी वाढविण्यासाठी सातत्याने भरीव प्रयत्नांची आवश्यकता आहे. या कार्यक्रमात वरील सर्व घटकांनी आपले योगदान देवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपण सर्वांनी मिळून हा मिशन जरेवाडी अभियान उपक्रम निश्चितपणे यशस्वी करु याची मला खात्री आहे असेही शेवटी गटशिक्षणाधिकारी उजगरे म्हणाले.

# सरकारने शेतीपिकांचा हमीभाव ठरवावा, अभिनेते मकरंद अनासपुरेंची मागणी

## मॉलमध्ये बर्गेनिंग होत नाही पण शेतकऱ्यांकडून घेताना होते

बारामती : शेतकऱ्यांचा माल आहे म्हटलं की त्याची बार्गेनिंग सुरु होते. पण एखाद्या मॉलमध्ये वस्तू घेताना बर्गेनिंग केलं जातं नाही अशी खंत अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी बोलून दाखवली. शेतकऱ्यांकडे पिकवायची क्षमता आहे. पण साठवून ठेवू शकत नाही, म्हणून त्याचा माल कवडीमोल भावाने विकावा लागतो असेही मकरंद अनासपुरे म्हणाले. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाचा हमीभाव ठरवला पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने कृषिक २०२५ हे भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या कृषी प्रदर्शनाची पाहणी शनिवारी मकरंद अनासपुरे यांनी केली. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शेतीचे प्रश्न मांडले. शेतकऱ्यांनी शेतीची पद्धत बदलावी तसेच सामूहिक शेती



सुरू करावी. शेतमालाच बार्गेनिंग केलं जातं परंतु एखादा मॉलमध्ये वस्तू घेताना बर्गेनिंग केलं जातं नाही असेही ते म्हणाले. शेतकऱ्यांचा शेतमाल कवडीमोल दरानं घेतला जात आहे, त्यामुळं सरकारनं शेतमालाचे हमीभाव ठरवावेत अशी मागणी यावेळी अनासपुरे यांनी केली.

### २० जानेवारीपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुलं

बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रात भव्य असे कृषी प्रदर्शन भरले आहे. दिनांक १६ जानेवारीपासून हे प्रदर्शन सुरु झाले आहे. २० तारखेपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असणार आहे. या प्रदर्शनात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती क्षेत्रात चांगले प्रयोग करण्यात आले आहेत. च्या वापर करुन यशस्वी अशा प्रकारे ऊस शेती करण्यात आली आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळत आहे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक धर्म दिन

### महत्वाच्या घटना

१७७८ : कॅप्टन जेम्स कूक हा हवाई बेटांवर पोचणारा पहिला युरोपियन बनला.
१९११ : युजीन बी. इलायने सानफ्रान्सिस्कोच्या बंदरात उभ्या असलेल्या यु. एस. एस. पेनसिल्व्हेनिया या जहाजावर विमान उतरवले. जहाजावर विमान उतरण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.
१९५६ : संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी मुंबईत ११४ वेळा गोळीबार
१९६४ : न्यूयॉर्क येथे वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतीचे भूमिपूजन झाले.
१९७४ : इजिप्त व इस्त्राएल यांच्यात शांतता करारावर सह्या झाल्या.
१९९७ : नोर्वेच्या बोर्ग आऊसलंडने एकट्याने व कोणाच्याही मदतीशिवाय अटलांटिक महासागर पार केला.
१९९८ : मदनमोहन पूंछी यांनी भारताचे २८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९९ : नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.
२००५ : एअरबस ए-३८० या जगातील सर्वात मोठ्या प्रवासी विमनाचे अनावरण करण्यात आले.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९३ : महाराष्ट्रातील एक प्रजाहितदक्ष पण दुर्दैवी राजे प्रतापसिंह भोसले यांचे निधन. छत्रपती शाहू (दुसरे) यांचे ते थोरले चिरंजीव होत. पेशवाईच्या अस्तानंतर माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन यांनी पुन: त्यांना छत्रपतींच्या गादीवर बसवले. पाठशाळा आणि संस्कृत व मराठीबरोबरच इंग्रजी भाषेच्या अध्यापनाला त्यांनी उत्तेजन दिले. (मृत्यू:४ आक्टोबर१८४७)
१८३३ : अमेरिकन संशोधक रे डॉल्बी यांचा जन्म.
१८४२ : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे समाजसुधारक, धर्मसुधारक, अर्थशास्त्रज्ञ व न्यायाधीश (मृत्यू:१६ जानेवारी१९०१)
१८५४ : अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांचा मदतनीस तसेच त्यांचा पहिल्या दुरध्वनी संभाषणातील भागीदार थॉमस वॉटसन यांचा जन्म.
१८८९ : देवनहळ्ळी वेंकटरामनय्या गुंडप्पा तथा डी. व्ही. जी. कन्नड कवी व विचारवंत (मृत्यू:७ आक्टोबर१९७५ बंगळुरू, कर्नाटक)
१८८९ : शंकर काशिनाथ गर्गे तथा 'दिवाकर' – नाट्यछटाकार (मृत्यू:१ आक्टोबर १९३१)
१८९२ : अमेरिकन अभिनेता ऑलिव्हर हार्डी यांचा जन्म.
१९३३ : जगदीश शरण वर्मा – भारताचे २७ वे सरन्यायाधीश (मृत्यू:२२ एप्रिल २०१३)
१९५२ : वीरप्पन – चंदन तस्कर (मृत्यू:१८ आक्टोबर २००४)
१९६६ : अलेक्झांडर खलिफमान – रशियन बुद्धिबळपटू
१९७२ : विनोद कांबळी – भारतीय क्रिकेटपटू
१९९५ : साहित्यिक, कवी आणि शिक्षणतज्ज्ञ वि. द. घाटे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९३ : आत्माराम रावजी भट – कृतिशील विचारवंत, 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चे संस्थापक (जन्म:१२ मे१९०५)
१९३६ : रुडयार्ड किपलिंग – नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश लेखक (जन्म:३० डिसेंबर १८६५)
१९४७ : कुंदनलान सैगल – गायक व अभिनेते (जन्म:११ एप्रिल १९०४)
१९६७ : कृषितज्ज्ञ डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांचे निधन.
१९७१ : भारीतय वकील आणि संसद सदस्य बॅरीस्टर नाथ पै यांचे निधन.
१९९६ : एन. टी. रामाराव – तेलगू अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व आंध्रप्रदेशचे १० वे मुख्यमंत्री (जन्म:२८ मे १९२३)
२००३ : हरिवंशराय बच्चन – हिन्दी कवी (जन्म:२७ नोव्हेंबर १९०७)
२०१५ : शकुंतला महाजन तथा 'बेबी शकुंतला' – लोभसवाणे रूप, शालीन सौंदर्य आणि कसदार अभिनयाच्या माध्यमातून चित्रपटसृष्टीत अमीट अशी मुद्रा उमटविणाऱ्या अभिनेत्री.

## आले लागवडीतून शेतकऱ्यांना चांगला फायदा



भारतातील जवळजवळ सर्व स्वयंपाकघरांमध्ये आल्याचा वापर स्वयंपाकासाठी केला जातो. आले हे एक महत्त्वाचे औषधी पीक आहे, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. आल्यामध्ये कॅल्शियम, मॅंगनीज, फॉस्फरस, झिंक आणि व्हिटॅमिन सी यासह अनेक औषधी गुणधर्म असतात. आल्याचा उपयोग औषधी म्हणूनही केला जातो. आल्यापासून बनवलेल्या सुक्या आल्याची बाजारात किंमत जास्त आहे. भारतीय बाजारपेठेत आल्याला वर्षभर मागणी असते. त्यामुळे शेतकरी त्याच्या लागवडीतून चांगला नफा मिळवू शकतात.

योग्य माती आणि हवामान : आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५ सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते. त्याच्या झाडांना चांगली आर्द्रता आणि योग्य सिंचन आवश्यक आहे. आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्याचे उत्पादन ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये केले जाते.

शेणखताचा वापर : आल्याच्या शेतातून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात शेणखत वापरावे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कुजलेले शेणखत, निंबोळी आणि गांडूळ खत घालून ते शेताच्या जमिनीत चांगले मिसळावे. यानंतर, माती समतल करावी. आता शेतकऱ्यांना ते लहान-लहान वाफ्यात विभागून हेक्टरी २ ते ३ क्विंटल बियाणे घेऊन शेतात पेरणी करावी लागते. दक्षिण भारतात, आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्यानंतर सिंचन केले जाते.

कमाई लाखात : बियाणे पेरल्यानंतर ८ ते ९ महिन्यांनी पीक पूर्णपणे तयार होते. आल्याचे पीक योग्य प्रकारे पिकल्यावर त्याची वाढ थांबते आणि पिके पिवळी पडून सुकायला लागतात. आल्याची लागवड केल्यास शेतकऱ्यांना हेक्टरी १५० ते २०० क्विंटल उत्पादन मिळू शकते. बाजारात यापैकी एक किलोची किंमत सुमारे ४० रुपये किंवा त्याहून अधिक आहे. त्याची लागवड करून शेतकरी ३.५ ते ४ लाख रुपये सहज कमवू शकतात.

## शेणखतापासून तयार करा माशांचा चारा; मिळेल चांगले उप्पादन

शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालनही मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे मत्स्यपालनाशी संबंधित अशा तंत्रांबद्दल जाणून घेण्याची गरज आहे. ज्याचा अवलंब करून मत्स्यपालनातून चांगले उत्पादन मिळवू शकता.

मत्स्यपालनासाठी तळ्याची खोली किती असावी?

मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर २० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात.

संमिश्र मत्स्यपालन वापरा : कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण



तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.


शेणामुळे माशांचे वजन वाढेल : जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात.

सुरुवातीला २ हजार किलो शेण टाका : भारतीय कृषी संशोधन परिषदेने केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात. यामुळेच आयसीएआरने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.

## सोनचाफा फुलशेतीमधून मिळतो मोठा नफा

दुर्मिळ सोनचाफ्यांची गुणवैशिष्ट्ये ओळखून त्याची कलमे करून अभिवृद्धी केल्यास अशा जातिवंत कलमांपासून आपणास फुलांचे उत्पादन घेणे शक्य आहे. कलमांची लागवड केली असता अशा झाडांपासून लवकर व झाडांची कमी उंची ठेवून आपणास फुलांचे उत्पादन घेता येते. यापासून आपणास फुले विकून पैसे तर मिळतातच, परंतु चाफ्याच्या सुगंधाने मन उल्हसित राहून ताणतणावांपासून मुक्त राहण्याचा आनंद मिळतो तो वेगळाच.

कलमे करून अभिवृद्धी चाफ्याचे कलम जातिवंत मातृवृक्षावर भेट कलम पद्धतीने केले जाते. यासाठी मूळरोप चाफ्याचेच वापरले जाते.अशी कलमे झाडावर तयार होण्यास ४ ते ५ महिन्यांचा कालावधी लागतो. ही कलमे झाडावर तयार झाली, की पावसाळ्याच्या सुरवातीस झाडावरून उतरवून ती नर्सरीमध्ये मोठ्या पॉलिथिन बॅगमध्ये किंवा डब्यामध्ये जोपासना केली जाते. साधारणत: एक वर्षानंतर ही कलमे लागवडीस योग्य होतात. अशी कलमे लावताना त्याची पूर्ण माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. फुलशेतीसाठी सोनचाफा लावताना त्याची निवड करणे हे फार महत्त्वाचे आहे. सोनचाफ्यामध्ये अनेक प्रकार असून, त्यांना फुले येण्याचा कालावधी वेगवेगळा आहे. यामध्ये प्रकारांबरोबरच फुलांचा रंगही वेगवेगळा असतो. त्यामुळे फुलांच्या बाजारामध्ये दराचा ग्राहकाचा व टिकाऊपणाचा विचार करून सोनचाफ्याची लागवड करावी. यासाठी गडद पिवळा व गडद केशरी किंवा



सिमाचल केशरी यांची कलमे लावावीत.

जमीन : सोनचाफा लागवड करताना पाण्याचा निचरा उत्तमप्रकारे होणारी जमीन हवी. तसेच सूर्यप्रकाश भरपूर हवा. इतर झाडांची सावली असल्यास सूर्यप्रकाशाकरिता ही झाडे उंच वाढतात. नंतर फुले काढणे अवघड होते. पाण्याचा निचरा होणारी कोणतीही जमीन, कोणतेही हवामान या झाडांना मानवते. या झाडाचा नैसर्गिक आढळ उष्ण दमट हवामानात असतो. त्यामुळे जास्त पाऊस व आर्द्रतेच्या परिसरात याची वाढ चांगली होते.

लागवडीचा काळ : पाण्याची बारमाही सोय असल्यास कोणत्याही हंगामामध्ये लागवड करता येते. कलम लावताना खड्डा ६० सेंमी द ६० सेंमी. द ६० सेंमी, असा खणून त्यामध्ये कुजलेले कंपोस्ट खत, गांडूळ खत व शेणखताने अर्धा भरावा. दोन झाडांमधील अंतर ३ मीटर व दोन ओळींमधील अंतर ३ मीटर ठेवावे. कलमाचा डबा अथवा पॉलिथिन बॅग हलकेच काढून मुळांना इजा न करता कलम लावावे. कलमाचा जोड असलेला भाग जमिनीच्या वर ठेवावा, तसेच जोडाजवळ मूळरोपाला येणारे फुटवे वेळोवेळी काढावेत. ३ द ३ मीटर याप्रमाणे लागवड केली असता एका आरला १० झाडे बसतात. एकरी ४०० व हेक्टरी १००० कलमांची लागवड करता येते.

खते व पाणी व्यवस्थापन : झाडांना वेळोवेळी शेण खत, गांडूळ खत व स्टेरामिल ही खते वाढीनुसार द्यावीत. जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाणी द्यावे. पावसाळ्यात कलमे लावलेल्या जागेमध्ये कोठेही पाणी साठून राहणार नाही याची काळजी घ्यावी. एक वर्षानंतर या कलमांना कळ्या येऊन फुले येऊ लागतात. सुरवातीस हे प्रमाण कमी जास्त असते. दोन वर्षांनंतर झाडांची वाढ जोमदार झाल्यावर प्रत्येक झाडाला सरासरी १५ ते २० फुले येतातच. फुले येण्याचा कमी जास्त काळ वगळता वर्षातून १८० दिवस फुले मिळतात. तीन वर्षानंतर झाडे चांगलीच जोमाने वाढून फुलांचे प्रमाण वाढते. झाडे अस्ताव्यस्त वाढून दाट होऊ नये यासाठी त्यांची छाटणी करून झाडे लहान ठेवता येतात. यामुळे फुले काढणे सोयीचे होते.

फुलांची काढणी : सकाळी लवकर फुले काढून ती जवळच्या बाजारामध्ये ३-४ तासातच पाठवावी. उन्हाने व धक्क्याने हे नाजूक फूल कोमेजते. यामुळे काढणी व विक्री या गोष्टी त्वरेने होणे महत्त्वाचे आहे. अशा फुलांना व्यापाऱ्यांकडून शेकडा ३० ते ४० रुपये दर मिळतो. सणासुदीच्या काळामध्ये यापेक्षा जास्त दर मिळतो. मेहनत व मशागतीचा खर्च वजा जाता हेक्टरी वार्षिक एक लाख रुपये तरी उत्पादन मिळते. ही फुले दादर, पुणे, स्थानिक फूलबाजारात विकली जातात. सोनचाफ्याच्या झाडांवर आजपर्यंत कोणतीही रोगराई नाही, तसेच चाफ्याच्या झाडांबाबत साप येतो वगैरेसारखे गैरसमज आहेत. चाफ्यासारख्या दुर्मिळ वृक्षाचे जतन व्हावे हाच यामागे हेतू आहे.

cmyk



# उमेद प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशीही लाखोंची उलाढाल

बीड। प्रतिनिधी

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद बीड द्वारा आयोजित बीड जिल्हास्तरीय सरस विक्री व प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी नागरिक व महिलांच्या प्रचंड प्रतिसादामुळे उमेद गटातील महिलांनी बनवलेल्या विविध मसाले, पापड, कुरडया, शेवया ,शोभेच्या वस्तू, पर्स, चप्पल, विविध गृहपयोगी वस्तू व खाद्यपदार्थाची ५.८० लाख रुपयाची विक्री झाली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड श्री आदित्य जीवने व प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या यावेळी सरस प्रदर्शनात विविध वस्तूंचे व खाद्यपदार्थांचे ११६ स्टॉल लावण्यात आलेले असून ग्रामीण भागातील उमेद गटांच्या महिलांनी बनवलेल्या स्वादिष्ट , रुचकर, अस्सल ग्रामीण शाकाहारी, मांसाहारी पदार्थ तसेच नाश्ता फराळाचे पदार्थांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. या सर्व स्टॉलला मिळत असलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी पाच लाख ८० हजाराची विक्री झाली आहे.तसेच सायंकाळी उमेद कर्मचारी, शासकीय कर्मचारी व स्टॉलधारक महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या विविध कलागुणांचे सादरीकरण केले .



मुख्यमंत्री शंभर दिवस कार्यक्रमाच्या माध्यमातून आज सकाळी सात ते सकाळी नऊ वाजेपर्यंत माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने, माननीय प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, माननीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री वासुदेव सोळंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री मुंडे, श्री प्रदीप काकडे, मोकाटे, श्री सुरेश केंद्रे इ. सह जिल्हा परिषदेतील सर्व विभाग प्रमुख उमेद सर्व स्टाफ इत्यादींनी जिल्हा परिषद कार्यालय परिसरात श्रमदान करून स्वच्छता मोहीम राबवली या कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री मुरहारी सावंत व जिल्हा व्यवस्थापक श्री शकील शेख यांनी केले.

सदरील सरस प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी उमेद अभियानातील कर्मचाऱ्यांच्या विविध समित्या तयार केल्या असून या समित्यांच्या माध्यमातून जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री मुरहरी सावंत,जिल्हा व्यवस्थापक शकील शेख ,आशा पवार, जीवन धापसे, भारत पवार, अश्विनी खेडकर, महेश कुलकर्णी ,आकाश मोरे, राहुल वाघमारे, तालुका अभियान व्यवस्थापक रश्मी गोसावी ,इरफान शेख, नंदा ओव्हाळ सचिन हारणावळ, सुप्रभा खेडकर, तात्यासाहेब लोंढे, विक्रम ठोंबरे, कैलास वीर , तुफेल शेख श्रीकांत तडेवार ,तालुका व्यवस्थापक कुणाल मुंडे, नारायण कराड ,ओमकार पंडित, विजय माले, सचिन चव्हाण, नितीन लवटे ,आनंद भोकरे, अब्दुल सय्यद, मनीषा डाळिंबकर प्रभाग समन्वयक प्रमोद देशमाने, माधव कचरे, संतोष माळी शैलेश चौधरी, अशोक पाटील ,राखी डोंगरे, स्वप्नील खाते, प्रीतम भोंडवे, युवराज गारदे, विजयकुमार वैष्णव, विठ्ठल चव्हाण, दादासाहेब राख, विष्णू भुरे, कुणाल बडवाईक ,राहुल ढोकणे, अमरनाथ गाभूड, किशोर उबरहंडे ,वैशाली देवकते, शकुंतला जावळे पुष्पा नागरगोजे ,अमोल गर्जे, सुरेश मुंडे, राजरत्न कसबे, इमरान खान, सोनिया चौरे, शितल गोरे, मनीषा मस्के, विजया विटोरे, अश्रुबा गोरे सपोर्ट स्टाफ भागवत सावजी, गोविंद इंदुरे ,जालिंदर रंधवे, रोहिदास गोरे ,अविनाश साबळे, राजेश आदमे इत्यादीं परिश्रम घेत आहेत. उमेद प्रदर्शनातील सर्व स्टॉलवर डिजिटल पेमेंटची सुविधा दिलेली असून यामुळे ग्राहकांची सुविधा झाली असून भेट देणाऱ्या ग्राहकांनी व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबद्दल स्टॉल धारक महिलांचे भरभरून कौतुक केले आहे तसेच खाद्यपदार्थ स्टॉल वरील महिला व्यावसायिक ॲप्रॉन ,कॅप, ग्लोज परिधान करून अत्यंत स्वच्छ पद्धतीने खाद्यपदार्थ देत असून एकूणच प्रदर्शन परिसरात स्वच्छता ठेवण्यात आलेली आहे.

# गायत्री महायज्ञ व सहस्त्र आवर्तन अभिषेक



बीड। प्रतिनिधी

गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वार च्या आशीर्वादाने हिंदूधर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने दिनांक- १७/०१/२०२५ शुक्रवार पौष वद्य संकट चतुर्थी निमित्त ''गायत्री महायज्ञ व (गणपती अथर्वशीर्ष) सहस्त्र आवर्तन अभिषेक'' आयोजित करण्यात आला . या यज्ञाचे यजमान-सौ.व श्री तुकाराम पंत जोशी सपरिवार हे होते.

आजच्या या गायत्री यज्ञाचे पुरोहित म्हणून गायत्री परिवाराचे बीड जिल्हा समन्वयक ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे होते, या कार्यक्रमात होम हवन तसेच एक गर्भसंस्कार हा कार्यक्रम देखील करण्यात आला, यावेळी यशवंत नगर मधील असंख्य माता भगिनी व भावीक भक्त उपस्थित होते.

यामध्ये ॲड.मंगेश पोकळे सर अध्यक्ष श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर, मुकुंद भुतपल्ले, विलास लेंबे,हनुमानदास बियाणी, अनिल शेठ चरखा, महावीर सेठ बोरा, चंपावती पत्र चे महादेव नाना साळुंके, मेढे साहेब, म्हेत्रे काका,भराटे काका, चाटे साहेब, जाधव साहेब,मुढे सर, बाळासाहेब जायभाये, सुरेखा जाधव, पोकळे ताई, लेंबे काकू, पोकळे काकू, वृंदावणी साळुंके, डॉ.आरती भूतपल्ले , अदी भाविक भक्त उपस्थित होते. अथर्वशीर्ष आवर्तना साठी वे.शा.संपन्न नारायणदेव सुलाखे सह ११ ब्रम्हवंद हजर होते.



जालना : भगवानगडाचे मठाधिपती हभप नामदेव शास्त्री महाराज व कृष्णा महाराज शास्त्री भगवानगड हे जालना येथे आले असता, त्यांचा सत्कार करतांना शिवसेना जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे. गडाचे ट्रस्टी राजेद्र राख, कैलासराव जगताप, देवानंद सानप, प्रकाश जायभाये, खेडकर यांची उपस्थिती होती

# आ. सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड,पुस्तकांचे वाटप

वडवणी। प्रतिनिधी

लढा दुष्काळाची फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांच्या वतीने माजलगाव मतदारसंघाचे लोकप्रिय नेते आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे ऊस संवाद परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी माजलगाव मतदार संघातील हजारो शेतकरी ऊस उत्पादक उपस्थित होते. लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष वीरेंद्र सोळंके व उपाध्यक्ष जयसिंह सोळंके यांची या




कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी ऊस संशोधकांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलं. या कार्यक्रमानंतर लगेच लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या वतीने परिसरात प्रकाश दादा सोळंके यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त ७१ झाडे लावण्यात आले व ७१ लोकांना मासाहेब जिजाऊंच्या चरित्राचे पुस्तक वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात ग्राहक भांडारचे व्यवस्थापक भगवान शेजुळ यांच्यासह विविध कंपन्यांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांनी उपस्थित सर्वांना झाडे वाटप केले. यावेळी पिंपरखेडचे सरपंच अशोक निपटे, देवगावचे माजी सरपंच ज्ञानेश्वर सुरवसे, पत्रकार हनुमंत मात्रे, पत्रकार ज्ञानेश्वर लंगे, पत्रकार अंकुश गवळी यांचीही उपस्थिती होती. आमदार सोळंके यांना दीर्घायुष्य लाभाव आणि त्यांचे विकास प्रिय नेतृत्व असंच फुलत राहावं अशा पद्धतीच्या शुभेच्छा यावेळी ऍडव्होकेट राज पाटील यांनी दिल्या.

आष्टी तालुका पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना लोकनेते दमदार आमदार सुरेश आण्णा धस पत्रकार संघाचे मार्गदर्शक सरपंच परिषद महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे सचिव शरद रेडेकर कोषाध्यक्ष गणेश दळवी ज्येष्ठ पत्रकार भीमराव गुरव अण्णा माजी अध्यक्ष शरद तळेकर सर सचिन रानडे मनोज पोकळे आदी या सर्वांच्या उपस्थितीत अद्वोतचंद्र या निवासस्थानी प्रकाशन करण्यात आले

# प्रात्यक्षिकाभिमुख कृषि प्रदर्शन भेटीतून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास – डॉ.साळुंके

बीड। प्रतिनिधी

सौ.के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कृषि विज्ञान केंद्र बारामती येथे आयोजीत कृषिक २०२५ या भारतातील सर्वात मोठया प्रात्यक्षिकाभिमुख कृषि प्रदर्शनाला दि.१६ जानेवारी रोजी भेट दिली. श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण संस्थेचे सहसचिव डॉ. जी.व्ही. साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी नेहमीच प्रात्यक्षिकावर भर दिला जातो तसेच महाराष्ट्रात आणि परराज्यातही शैक्षणिक भेटींचे आयोजन केले जाते. दि. १६ ते २० जानेवारी दरम्यान होत असलेल्या कृषिक- २०२५ ला देखील भेट देण्यात आली. या शैक्षणिक भेटीमध्ये महाविद्यालयातील एकूण ९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



कृषिक-२०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी फळ पिकांच्या विविध जाती, भाजीपाल्यांचे विविध वाण, विकसित तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारीत यंत्र, सेन्सर, ड्रोन तंत्रज्ञान, यंत्राद्वारे कलम करण्याच्या पध्दती, हायड्रोपोनिक्स, व्हर्टिकल फार्मिंग, पूर्व अनुमानित शेती तंत्र, ऊसाच्या विविध जाती व तंत्रज्ञान, पाणी देण्याच्या विविध पध्दती, कमी पाण्यावरील शेती, नामांकित कंपन्यांचे भाजीपाला पिकांचे विविध वाणांचे प्लॉट्स, ऑर्किड लागवड, दूध काढण्याच्या मशिनरी, ट्रॅक्टरचलित विविध अवजारे, यंत्र, ऊसतोडणी यंत्र, फवारणी ब्लोअर, तसेच विविध शेती उपयोगी यंत्रसामग्री, गांडूळखत निर्मिती तंत्र, पशु प्रदर्शन यामध्ये विविध प्रजातीचे वळू, गाई, शेळया, कोंबडया ई., पशुखाद्य, विविध कंपन्यांचे स्टॉल, मधुमक्षिका पालन, विविध पिकांचे लांगवड तंत्र, आंतरपिक पध्दती आदि गोष्टींची सखोल माहिति घेतली.विविध विद्यापीठांतील नवीन तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी शैक्षणिक भेटी या महत्वाच्या असतात तसेच कृषि प्रदर्शन पाहिल्याने विद्यार्थ्यांना नविन तंत्रज्ञानाची माहिति होऊन कृषिच्या विद्यार्थ्यांमार्फत हे नवीन तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत लवकर पोहोचण्यास मदत होते. कृषि हा भारताचा मुख्य आर्थिक कणा असून कृषिचे विद्यार्थी कृषि क्षेत्राचा विकास करण्यात अग्रेसर आहेत. त्यामुळे हे महाविद्यालय विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देत आहे असे प्रतिपादन संस्थेचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंके यांनी केले. ही शैक्षणिक भेट यशस्वी करण्याकरिता डॉ.जी.व्ही. साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली सहल विभाग प्रमुख प्रा.एस.एस. राठोड, प्रा. पी.बी. मांजरे, प्रा. एस.व्ही राठोड, डॉ.एस.जी. माने, प्रा. एल.एम. बोंद्रे आणि प्रा.ए.जी. गार्डी यांनी परिश्रम घेवून सहल यशस्वी केली. बारामती येथील शैक्षणिक भेटीनंतर विद्यार्थ्यांनी समाधानकारक प्रतिक्रिया व्यक्त केल्या.



जालना : युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर यांची वाढदिवसानिमित्त भेट घेऊन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, अजय कदम, उपजिल्हाप्रमुख गणेश मोहीते, आदित्य घुगे, सरपंच संदीप काळे यांची उपस्थिती होती.


## पाहिजेत

## ग्रामपंचायत कानडी खुर्द ता.आष्टी जि.बीड

### ग्रामपंचायत ग्रामरोजगार सहाय्यक पदभरती-२०२५

### जाहिरात क्रमांक:- ०१/२०२५ दिनांक:-२०-०१-२०२५

**संदर्भ:-** १)महाराष्ट्र शासन नियोजन विभाग,शासन क्र./मग्रारो-२०११/प्र. क्र-४०/रोहयो-१०-अ मंत्रालय मुंबई-३२ दि.२-मे-२०११. २)महाराष्ट्र शासन नियोजन विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक/मग्रारो-२०२४/प्र क्र-६३/रोहयो-१०अ मंत्रालय मुंबई-३२ दि.०३-१०-२०२४ नुसार, ३)ग्रामपंचायत कार्यालय कानडी खुर्द येथील मासिक सभा दिनांक: -२०-१२-२०२४ ठराव क्र.०४ ग्रामपंचायत कानडी खुर्द ता.आष्टी जि.बीड यांचेकडून कळविण्यात येते की आपल्या ग्रा.पं. चा ग्रामरोजगार सहाय्यक दि.१७/१२ /२०२३ रोजी मयत झाल्याने हे पद रिक्त झाले आहे. सदर पद भरतीबाबत दि.२०-१२-२०२४ रोजीच्या मासिकसभेत रिक्त पदाच्या भरतीबाबत नियमाप्रमाणे ग्रामरोजगार सहाय्यक यांच्या निवडी/नेमणुकीबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात आला आहे.त्या अनुषंगाने ग्रामरोजगार सहाय्यक पदाच्या निवडीसाठी इच्छूकाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.तरी इच्छुकांनी आपले अर्ज विहित कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयात समक्ष आणून द्यावेत. अर्ज हे दिनांक २०-०१-२०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून ते दिनांक २५-०१-२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.विहित कालावधीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**पदाबाबत सविस्तर माहिती :** महाराष्ट्र शासन नियोजन विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक/मग्रारो-२०२४/प्र क्र-६३/रोहयो-१०अ मंत्रालय मुंबई-३२ दि.०३-१०-२०२४ नुसार मानधन राहील.

**१)पदाचे नाव:-** ग्रामरोजगार सहाय्यक
**२) मानधन :** प्रतिमहा-वरील शासन निर्णयानुसार व इतर भत्ते,
३) शैक्षणिक अहर्ता- १० वी पास असलेले किंवा १२ वी पास असलेले प्रमाणपत्र व दाखला,गुणपत्रक
४) सामाजीक आरक्षण-जातीचा प्रवर्ग:-अ.जा./अ.ज./ इमाव/सर्वसाधारण

**५) अर्जासोबत:**

१) विहित नमुन्यात अर्ज
२) शाळेचा दाखला व गुणपत्रक प्रमाणपत्र
३) अर्जदार हा स्थानिक ग्रामपंचायत क्षेत्रातील रहिवासी असावा. रहिवासी प्रमाणपत्र स्वयंघोषित जोडावे.
४) रेशनकार्ड,आधारकार्ड, पॅनकार्ड,पासपोर्ट फोटो, राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेले पासबुकची झेरॉक्स.
६)वयोमर्यादा-आरक्षित व खुला प्रवर्गासाठी शासन निर्णयानुसार किमान व कमाल वयोमर्यादा विचारात घेतली जाईल.
७) ग्रामरोजगार सहाय्यक यांना शासनाने व ग्रामपंचायत ने नेमून दिलेले रोहयोचे सर्व कामे करावी लागतील.
८) मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेली जात प्रमाणपत्र/ वैधता प्रमाणपत्र सत्यप्रत सोबत जोडावी.
९) पात्र/अपात्र अर्जाची व नेमणुकीची माहिती ग्रा.पं. नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाईल.त्या संबंधीचा कोणताही वेगळ्याने पत्रव्यवहार केला जाणार नाही.
१०) सदर निवड ही ग्रामसभेत अंतिम केली जाईल व ग्रामरोजगार सहाय्यकास नेमणुकीचे आदेश दिले जातील.
११) निवडीबाबतचे सर्व अधिकार हे ग्रामपंचायतीस राहतील.

**प्रत माहितीस्तव:-**
१) ग्रामपंचायत नोटिसबोर्ड
२) दैनिक पेपर
३) दवंडी द्वारे
दि.२०-०१-२०२५

स्वाक्षरीत
**सरपंच/ग्रामसेवक**
ग्रामपंचायत कानडी खुर्द, ता.आष्टी जि.बीड


# सिद्धी देशपांडेला ए ग्रेड मानांकन

अंबाजोगाई

महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शिक्षण विभाग व कला संचालनालय मुंबईच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शासकीय ग्रेड चित्रकला (इंटरमेजिएट)परीक्षेत कु.सिद्धी राहूल देशपांडे हिने ' ए ग्रेड ' मानांकन प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे तिला चित्रकला शिक्षिका मेघा अकोलकर,डी.आर. बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले .सिध्दी देशपांडे ही योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुकूंलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी असून तिच्या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर,पदाधिकारी जी.बी.व्यास,ॲड. जगदीश चौसाळकर, कमलाकर चौसाळकर,डॉ.शैलेष वैद्य,प्रा.भीमाशंकर शेटे, डॉ.जयश्री देशपांडे, ॲड.कल्याणी विर्धे यांच्यासह शालेय पदाधिकारी,शिक्षिका, कर्मचारी,डॉ.सतिश देशपांडे,प्रा.सतीश पत्की,देशपांडे व पत्की परिवार,पत्रकार मित्र मंडळ,दासोपंत सत्संग मंडळ,महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळ, गुड मॉर्निंग ग्रूप आदीसह इतर नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे.



# बीड रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या

## अहेमदनगर-बीड-परळी दरम्यान असलेल्या सर्व रेल्वे स्टेशनवर उर्दू भाषेतूनही नावे लिहा-ॲड. शेख शफिक






बीड। प्रतिनिधी

लवकरच बीड रेल्वे स्टेशनचे उद्घाटन होणार आहे. तत्पूर्वी बीडच्या रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे तसेच अहेमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गादरम्यान जेवढी रेल्वे स्टेशन्स आहेत त्या सर्व रेल्वे स्टेशन्सवर उर्दू भाषेतूनही नावे लिहिण्यात यावे अशी मागणी एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

या याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड रेल्वे स्टेशनचा उद्घाटन सोहळा दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी शासनाने निश्चित केलेला आहे. तत्पूर्वी सदरील रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव देण्यासाठी बीड जिल्ह्यातील बऱ्याच सामाजिक संघटना व राजकीय पक्षांनी निवेदन दिलेले आहे. आमचीही मागणी हीच आहे की, बीड जिल्हा रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे. तसेच अहेमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गदरम्यान असलेल्या सर्व रेल्वे स्टेशनवर ऊर्दू भाषेतूनही नामफलक लावण्यात यावे. देशभरात ज्या ठिकाणी रेल्वे मार्ग व सेवा आहे त्या-त्या ठिकाणी रेल्वे स्टेशनवर इंग्रजीसह, ऊर्दु आणि राज्याच्या स्थानिक भाषेमध्ये बोर्ड लावण्यात येतात. यात प्रामुख्याने ऊर्दु बोर्ड हे देशभरात सर्व रेल्वे स्टेशनवर आहेत. परंतु अहेमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गादरम्यान जेवढे रेल्वे स्टेशन आहेत तिथे फक्त इंग्रजी व मराठी या दोनच भाषेत नामफलक लावण्यात आलेले आहेत. ऊर्दू भाषेत लावण्यात आलेले नाहीत ते बीड रेल्वे स्टेशनच्या उद्घाटना अगोदर ताबडतोब लावण्यात यावे. अशी मागणी एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

### उपोषणार्थीची भेट घेऊन दिला पाठिंबा

बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यासाठी उपोषणाला बसलेल्या चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते अनुरथ सोपानराव वीर यांच्या उपोषणाला एआयएमआयएम पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष शिवाजी भोसकर, मानसे मोमीन अजहर, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा समन्वयक सैफअली लालू भैय्या, मार्गदर्शक रियाज खान, शेख फारूक, शेख सय्यद बासेद, शेख हारुन आदी उपस्थित होते.

cmyk

राज्य
# लोकतंत्र
रविवार, दि.१९ जानेवारी २०२५ | ६

# पवनऊर्जा संदर्भातील तक्रारी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी पाठक यांच्याकडे दाखल कराव्यात -ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**पवनऊर्जा प्रकल्पासंदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्याच बरोबर त्यातील खंडणीखोर देखील वाढले आहेत. शेतकऱ्यांनी पवनऊर्जा संच उभारताना जर कोणता नियम भंग होत असेल, तर त्याची तक्रार जिल्हाधकाऱ्यांकडे असलेल्या समितीकडे कराव्यात, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.**

राज्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी संपदित झालेल्या जमीन खरेदी व्यवहारातील गैरप्रकार त्याचप्रमाणे संपादित जमिनीपेक्षा जादा अतिक्रमण करणे, अशा प्रकारामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात जिल्हास्तरावर आणि उपविभाग स्तरावर समित्या स्थापन केलेल्या आहेत.

या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासने, पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे, पवन ऊर्जा प्रकल्पंबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे, त्याचप्रमाणे जमीन मालक, शेतकरी, स्थानिक ग्रामस्थ आणि प्रकल्प विकसक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे, प्रकल्प उभारणीसाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहाय्य करणे, इत्यादी अधिकार दिलेले आहेत.



पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत. तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे महाऊर्जा कडील अधिकारी या समितीच्या सदस्य सचिव आहे. यामध्ये सदस्य म्हणून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अधीक्षक अभियंता महावितरण, अधीक्षक भूमी अभिलेख, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सह जिल्हा निबंधक वर्ग एक, संबंधित उप वनसंरक्षक, संबंधित पवन ऊर्जा प्रकल्पाची विकसक / प्रकल्प धारक यांचे प्राधिकृत प्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त संबंधित शेतकऱ्यांचे दोन प्रतिनिधी इत्यादी सदस्य आहेत. तर निवासी उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जाच्या कोणताही एक अधिकारी निमंत्रक व समन्वयक म्हणून काम पाहतो.

उपविभाग स्तरावर असलेल्या समन्वय समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष, मुख्यालय तहसीलदार समन्वय तथा सदस्य सचिव, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम, उप अभियंता जिल्हा परिषद, उपकार्यकारी अभियंता, महावितरण, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, तालुका कृषी अधिकारी, संबंधित सहाय्यक वन संरक्षक, संबंधित पवन ऊर्जा विकसक अथवा प्रकल्प धारक यांचे प्रतिनिधी, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि संबंधित गावच्या सरपंच किंवा प्रतिनिधी यांचा या समितीत समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाने ही समिती दिनांक २१ ऑक्टोबर २०१३ रोजी स्थापन केलेली आहे. मात्र याला वेळोवेळी प्रसिद्धी न दिल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत गेल्या आहेत. त्याचबरोबर संबंधित प्रकल्प विकसक हे देखील यात अनभिज्ञ असल्याने खंडणीखोरा संदर्भात ते तक्रारी करत नाहीत. एकूणच सर्व स्तरावरून संगणमत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत चाललेल्या आहेत. त्यामुळे पवन ऊर्जा संदर्भात जर तक्रारी असतील तर शेतकऱ्यांनी त्या जिल्हास्तरावर अथवा उपविभाग स्तरावर दाखल करून तक्रारींचा योग्य निपटारा करून घ्यावा, असे आवाहन ॲड. देशमुख यांनी केले आहे.

## महिला सरपंचाला मागितली एक लाखाची खंडणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ममदापूर पाटोदा ग्रामपंचायतच्या महिला सरपंचाला गावातीलच उपसरपंच व अन्य दोन ग्रामपंचायत सदस्यांनी एक लाख रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ममदापूर पाटोदा येथील महिला सरपंच मंगल राम मामडगे यांना तिघाजणांनी एक लाख रुपये खंडणी मागितल्याची फिर्याद दिल्यानंतर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ममदापूर पाटोदा या गावात विकास कामाकरिता निधी आल्यानंतर वेळोवेळी हेच लोक अडथळे आणतात. () त्याचबरोबर शासकीय कार्यालयात जाऊन खोट्या तक्रारी देतात. आपल्यावर मानसिक दहशत टाकतात. असे प्रकार वारंवार होत होते. (दि. १६) ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हा परिषद शाळा ममदापूर येथील दुरुस्तीची कामे सुरू होती. ते पाहण्याकरिता जात असताना वसंत सोपान शिंदे, अनिल लालासाहेब देशमुख व ज्ञानोबा श्रीमंतराव देशमुख हे शाळेजवळ आले. एकमेकांना बोलत असताना गावातील साक्षीदार दोन व्यक्ती समोर त्यांनी सरपंचांना शाळा दुरुस्तीच्या कामासाठी आलेल्या चार लाख रुपयांपैकी एक लाख रुपये आम्हाला द्या अशी मागणी केली. एक लाख रुपये नाही दिले तर तुम्हाला गावातील कोणतेच काम करू देणार नाही. तसेच तुमच्याविरोधात अर्ज देऊन आधीच्या माजी महिला सरपंचांनी आम्हाला पैसे न दिल्यामुळे त्यांना जेलमध्ये जावे लागले तशीच तुमची अवस्था करून टाकू अशी धमकी दिली. याबाबत त्याच वेळी या लोकांविरुद्ध ऑनलाइन तक्रार केली होती. त्यामुळे १५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष पोलिस ठाण्यात येऊन आपण तक्रार नोंदवत असल्याचे या महिला सरपंचांनी फिर्यादीत म्हटले आहे. त्यावरून तीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस करीत आहेत.



**आष्टी : तालुका पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना आमदार सुरेश धस. पत्रकार संघाचे मार्गदर्शक सरपंच परिषद महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे, सचिव शरद रेडेकर, कोषाध्यक्ष गणेश दळवी, ज्येष्ठ पत्रकार भीमराव गुरव, माजी अध्यक्ष शरद तळेकर, सचिन रानडे, मनोज पोकळे. या सर्वांच्या उपस्थितीत अद्वोतचंद्र या निवासस्थानी प्रकाशन करण्यात आले.**

## दर रविवारी कुषी दुकाने बंद वडवणी तालुका कृषी असोसिएशनचा निर्णय

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सर्व कृषी साहित्य विक्रेत्यांनी आज पासून प्रत्येक आठवड्यातून एक दिवस १५ जानेवारी ते १५ मे पर्यंत प्रत्येक रविवारी दुकान बंद ठेवण्याचा निर्णय वडवणी तालुका कृषी असोसिएशन ने घेतला आहे.

वडवणी तालुक्यातील कृषी व्यापारी बांधवांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. वडवणी तालुक्यातील लहान-मोठे एकही कृषी दुकान रविवारी सुरू राहणार नाही, असा ठराव या बैठकीत करण्यात आला. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपण आपल्याला आगोदर एक जिवंत माणूस आहोत हे लक्षात घेतले पाहिजे. तरच आपल्याला आरोग्य धनसंपदा कळली आहे असे म्हणता येईल. माणसाच्या जीवनात पैसा हाच सर्वस्व नसतो त्या पलीकडे हि काही माणसाचं वैयक्तिक जिवन असतं खरं पाहिलं तर व्यापाऱ्यासारखा सतत कामातच गुंतणार दुसरा वर्ग नाही, मग तो व्यापारी ◀◀ पान ३ वर

## शेतीकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून पहाणे गरजेचे-कृषी अधिकारी विजयकुमार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेती असणाऱ्यांनी शेतीमध्ये वेगवेगळे बदल घडवून आणून उत्पन्न वाढीसाठी काम केले पाहिजे. शेतीपूरक वेगवेगळे व्यवसायाचा दृष्टीकोन ठेवला पाहिजे असे मत व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने शेती




व्यवसायावर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अरूंधती ◀◀ पान ३ वर

## मातकुळी ग्रामस्थांच्यावतीने नेत्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांचा झालेला निर्गुण खून याविषयी विधिमंडळात व प्रसार माध्यमातून नेत्यांनी उठवलेला आवाजामुळे आरोपींना मकोका व खुनाच्या गुन्ह्यात अडकविण्यासाठी मोलाची कामगिरी निभावल्याने त्यांच्या विरोधात परवा झालेल्या परळीतील आंदोलनात मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील, मराठा आयडॉल आमदार सुरेश आण्णा धस, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार संदिप भैया क्षीरसागर, आमदार प्रकाश सोळंके व



समाजसेविका अंजलीताई दमानिया यांच्या प्रतिमेला काळे फासून निषेध व्यक्त केला तसेच प्रतिमेला जोडे मारण्यात आल्यामुळे अन्याविरूध लढणाऱ्या आपल्या नेत्यांची विटंबना झाली म्हणून मातकुळी येथील ग्रामस्थांच्यावतीने गुरुवार दिनांक १६/१/२०२५ रोजी सकाळी आठ वाजता विधीवत पुजन करून अन्याविरूध आवाज उठविणा-या नेत्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला संतोष काका डोके, युवा उद्योजक तथा सुरेश आण्णा धस युवामंचाचे तात्यासाहेब जरे, युवा नेते अशोक (दादा) गोरे, उपसरपंच विशाल जरे, अमोल भैय्या डोके, सोमनाथ जरे, विठ्ठल मामा जरे, भिमराव खराडे, भाऊसाहेब जरे, सुरेश नाना जरे, मोहन पाचबैल, सिताराम जरे, नामदेव आबा डोके, महादेव डोके, प्रकाश डोके, सत्यम यादव, अजीत डोके, राम मामा जरे, मारूती डोके, सागर डोके, प्रवीण जरे, हरिश्चंद्र धोत्रे, माजी उपसरपंच बापूराव डोके, अनिल डोके, रामदास डोके, ज्ञानेश्वर डोके आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे चित्रकला परीक्षेत घवघवीत यश

### महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात आलेल्या इंटरमिजियट स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे चित्रकला परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात आलेल्या इंटरमिजिएट परीक्षेमध्ये जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून शाळेचा सन्मान वाढवला आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या चित्रकलेच्या इंटरमिजिएट, एलिमेंट्री परीक्षेमध्ये शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये इंटरमिजिएट परीक्षेचा शंभर टक्के निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत सर्व विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये सृष्टी खरटमोल, रितेश काळे, शुभम साबळे, दुर्गा डाके हे चार विद्यार्थ्यांनी ग्रेड संपादित केले आहे तर सय्यद हसन, गवळी नवाज, आदमाने साक्षी, लोखंडे समीक्षा या विद्यार्थ्यांनी ग्रेड मिळवला आहे. पठाण कामरान हा विद्यार्थी ग्रेड नी उत्तीर्ण झाला आहे. या चित्रकला स्पर्धेत एकूण २७ विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्व यशस्वी तथा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेच्या निकालात मोठा फायदा मिळणार आहे. ज्यामध्ये ग्रेड साठी ७ गुण, ग्रेड साठी ५ गुण तर ग्रेड साठी ३ गुण देण्यात येतात.

चित्रकला स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना श्रीमती अकोलकर एम डी यांनी या विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. याच मार्गदर्शनाच्या बळावर चित्रकला परीक्षमध्ये ◀◀ पान ३ वर

## हॉटेल चालक महिलेचा हात पकडला

जालना । प्रतिनिधी

अंबड शहरातील पाचोड रोडवर हॉटेल चालविणाऱ्या एका ४० वर्षीय महिलेला शहरातीलच एकाने शिवीगाळ करुन वाईट हेतुने हात पकडून तू माझ्या सोबत चल, असे म्हणत जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. एका मुलीच्या तक्रारीवरून परंतु या प्रकरणी सदरील महिलेचा मुलगा एका प्रकरणी बालसुधागरात आहे. म्हणून असा गुन्हा दाखल झाल्याची बोलल्या जात आहे. सदरील मुलावरचा गुन्हा दाखल माग घेण्यासाठी झाला असावे असा प्रयत्न होत असल्याचा बोलल्या जात आहे परंतु या प्रकरणी सदरील मुलावरचा गुन्हा मागे घेणे शक्य होत नसल्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री अमोल गुरले यांनी सांगितले. परंतु सदरील घटना अगोदरच्या वादातून किंवा राग मनात धरून गुन्हा दाखल झाला असावे अशी उलट चर्चा सुरू आहे. असे बोलल्या जात आहे . परंतु या प्रकरणी हॉटेलमध्ये महिलेचा हात पकडले प्रकरणी आरोपीची जामीन झाल्याचे सांगण्यात येत आहे. सदरील ही घटना (ता. १७) सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडली असून, याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, अंबड शहरातील शिक्षक कॉलनीसमोर पाचोड रोडवर एक महिला हॉटेल चालवते. आज सकाळी ती महिला हॉटेलवर काम करीत असतांना शहरातील शंकर कापसे याने या महिलेच्या अंगावर पाणी फेकले असता तिने जाब विचारल्यावर त्याने महिलेला शिवीगाळ करुन वाईट हेतुने हात पकडून तू माझ्या सोबत चल असे म्हणत जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. दरम्यान, साथीदार तेथे भांडण सोडविण्यास आले असता त्यांनाही शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या

दिल्या. याप्रकरणी पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन अंबड पोलिस ठाण्यात शंकर कापसे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ७४, ३५२, ३५१ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास जमादार श्री. घाणे हे करीत आहेत. सदरील प्रकरणी आरोपी यांची जामीन झाल्याचे समजते.

## सात गावाची लाईट सुरळीत करा -राजेंद्र

### नवीन मंजूर ५ ट्रान्सफॉर्मर तत्काळ बसवा

बीड । प्रतिनिधी

गेली चार पाच वर्षा पासून खांडे पारगाव परिसरातील खांडे पारगाव, अंथरवान प्रिंप्री, नागपूर खुर्द, उमरद खालसा, नागपूर बुद्रुक, उमरी, अंथरवण पिंप्री तांडा या सात गावाचा विद्युत पुरवठा सुरळीत होत नाही शेतकऱ्यांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा होत नाही सात गावात लाईट रोज रात्री चार ते पाच तास लाईट नसते वारंवार पाठपुरावा करून हि १९७० ते ८० च्या दशकातील विद्युत तारा ◀◀ पान ३ वर



# युवकांनी सामाजिक माध्यमाचा वापर करताना सामाजिक हानी होणार नाही याची काळजी घ्यावी -प्रा. डॉ. संदिपान किवणे

### समाज माध्यमे आणि युवक या विषयावर बौद्धिक सत्र

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोला येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी शिबिर मोजे बांगरवाडी येथे संपन्न होत आहे या शिबिराच्या पहिल्या बौद्धिक क्षेत्रात सामाजिक माध्यमे आणि युवकांची भूमिका या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी प्राचार्य डॉ सय्यद एस आर तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ संदीपान किवणे डॉ जाधव एस एम डॉ कल्पना घारगे ज्येष्ठ नागरिक उमाजी काळे शाळेच्या मुख्याधिका सौ घुमरे मॅडम उपस्थित होते या बौद्धिक क्षेत्रात प्रस्ताविक बंडू नाना काळे यांनी केले पाहुण्यांचा परिचय पार्वती काळे यांनी केला या कार्यक्रमाचे प्रस्तावित कार्यक्रम अधिकारी डॉ शिवाजीराव काकडे यांनी केले प्रमुख पाहुणे डॉ संदीपान किवने सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सध्याचे युग हे समाज माध्यमाचे युग असून समाज माध्यमाचा वापर करीत असताना सामाजिक राष्ट्रीय धार्मिक जाणिवा युवकांनी ठेवल्या पाहिजे समाज माध्यम ही आधुनिक काळातील संवादाची माध्यमे असली तरी हा संवाद साधत असताना राष्ट्रहित सामाजिक ऐक्य धार्मिक व्यवस्था वर्ग सामाजिक संरचना याचे युवकांनी भान ठेवले पाहिजे व्हाट्सअप इंटरनेट सामाजिक माध्यमे फेसबुक यांचा वापर युवकांनी स्वतः सकारात्मक दृष्टिकोनातून करावा समाजाला आपल्या कडून कोणतीही हानी होणार नाही याची युवकांनी काळजी घ्यावी अशी आव्हान डॉ की वनी यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी प्राचार्य डॉ सय्यद सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना युवकांनी तंत्रज्ञानाचा वापर करीत असताना तंत्रज्ञान वापरण्याचे भान ठेवले पाहिजेत आपल्या वर्तनातून आपल्या संवादातून आपल्या भूमिकातून सामाजिक राष्ट्रीय हानी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग असले तरी आपण संवेदनशील असले पाहिजेत अशी भूमिका मांडली याच बौद्धिक क्षेत्रात अ जीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने शेती विकास आणि शेतकरी या विषयावर शेतकऱ्यांची भूमिका यासाठी प्राध्यापक डॉ सुनील जाधव यांनी ◀◀ पान ३ वर





This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे ग्रामीण पोलिसांनी आंतरराज्यीय एटीएम लुटारू गँगला पकडले, १४७ कार्ड जप्त





पुणे - राजगड पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांच्या सजगतेमुळे एक आंतरराज्यीय टोळी ग्रामीण पोलिसांच्या हाती लागली आहे. ही टोळी एटीएम सेंटरमध्ये ग्राहकांना चाकूचा धाक दाखवून तसेच कार्डची अदला बदल करुन फसवणूक करत होती. या टोळीच्या ताब्यातून तब्बल १४७ एटीएम कार्ड हस्तगत करण्यात आले आहेत. ही टोळी उत्तर प्रदेशातील असून त्यांच्यावर तब्बल २० वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत.

समून रमजाद (३६, रा.हरियाणा), नसरुद्दीन नन्ने खान(३०, उत्तरप्रदेश), बादशाह इस्लाम खान( २४,रा. उत्तरप्रदेश) अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांचा एक साथीदार आदील सगीर खान(३०,रा.उत्तरप्रदेश) हा पळून गेला आहे. यासंदर्भात माहिती देताना पोलीस अधिक्षक पंकज देशमुख यांनी सांगितले की, राजगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश गवळी यांना दिल्ली पासिंगची एक कार संशंयीतरित्या खेडशिवापूर मार्गे कोल्हापूरच्या दिशेने जाताना दिसली. ही कार रस्त्यात थांबल्यावर एक व्यक्ती एटीएम सेंटरमध्ये थांबला होता. यामुळे अधिक संशय आल्याने त्यांनी गाडीचा पाठलाग सुरु ठेवला. तोवर त्यांनी राजगड पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांना खेड शिवापूर टोलनाक्यावर नाकाबंदी करायला लावून संशयीत कार थांबवण्यास सांगितले. त्यांनी कार थांबवताच त्यातील आदील खान हा पळून गेला. इतरांना ताब्यात घेतले असता, त्यांच्या गाडीत तब्बल १४७ एटीएम कार्ड सापडले. यानंतर त्यांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणण्यात आले. दरम्यान सायंकाळी माधवराव जल्लवाड (५६,रा. कोळवडे, भोर) हे राजगड पोलीस ठाण्यात दाखल झाले. त्यांनी सांगितले की, एटीएम सेंटरमध्ये असताना एका अनोळखी व्यक्तीने चाकूचा धाक दाखवून खिशातील दोन हजार रुपये काढून घेतले. तसेच एटीएम सेंटरमध्ये आमची माणसे आहेत, तुमच्या एटीएम कार्डचा पीन सांगा नाहीतर तुम्हाला जीवे मारु अशी धमकी दिली. यामुळे ते एटीएम कार्ड तेथेच सोडून निघुन आले. दरम्यान त्यांना आरोपी काही वेळातच कारमधून पळून जाताना दिसले. तसेच त्यांच्या बँक खात्यातून ५० हजाराची रक्कम कट झाल्याचा मेसेजही आला. त्यांना जप्त केलेली कार आणि आरोपी दाखवले असता, त्यांनी त्यांना ओळखले. त्यांची फिर्याद घेऊन चारही आरोपींना अटक करण्यात आली. आरोपींनी महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, बिहार, दिल्ली आदी राज्यांत अशा प्रकारे गुन्हे केले आहेत. ही कारवाई पोलीस अधिक्षक पंकज देशमुख, अपर अधिक्षक गणेश बिराजदार, उपविभागीय अधिकारी तानाजी बरडे, पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेश गवळी, पोलीस उपनिरीक्षक अजित पाटील, सहायक पोलीस उपनिरीक्षक अंबादास बुरटे यांच्या पथकाने केली. याप्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक अजित पाटील करत आहेत.

# नाक-तोंड दाबून मुलीचा खून; आईला जन्मठेप

पुणे । प्रतिनिधी



लग्नाच्या नैराश्येतून स्वतःच्या मुलीचा शालीने नाक-तोंड दाबून खून करणार्या अनिता सावळे (वय २५, रा. वारजे) हिला न्यायालयाने जन्मठेप आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी हा निकाल दिला. अनिता लग्नाला वैतागली होती.

नवरा बोलत नसल्याने तिने आत्महत्येचा प्रयत्न करत लग्नाच्या नैराश्येतून हे कृत्य केल्याचे पोलीस तपासात समोर आले होते. याप्रकरणी तिच्याविरोधात वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ४ फेब्रुवारी २०१६ रोजी ही घटना घडली. पती कामावर गेले असताना अनिता हिने घरात मुलीचा शालीने नाक-तोंड दाबून खून केला. त्यानंतर छताच्या पंख्याला साडीने गळफास घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. या घटनेने पुणे जिल्ह्यात खळबळ उडाली होती. वारजे पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास करून आरोपी महिलेला अटक करत आरोपपत्र दाखल केले. कौटुंबिक वादातून पती दोन दिवसांपासून बोलत नव्हता, तसेच सासूही प्रतिसाद देत नव्हती, असा कबुली जबाब आरोपीने दिला होता. खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील मिलिंद दातरंगे यांनी काम पाहिले. त्यांनी सरकार पक्षातर्फे २० साक्षीदार तपासले.

माझ्यामागे बाळाची फरफट होऊ नये, म्हणून तिला सोबत नेत आहे, अशी चिठ्ठी तिने लिहिली होती. लग्नाच्या नैराश्येतून तिने हे पाऊल उचलल्याने गुन्ह्यामागचा हेतू सिद्ध झाल्याचे सरकार पक्षाने सिद्ध केले. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे निष्पाप बालिकेचा जीव गमावला असून, तिला जास्तीत जास्त कठोर शिक्षा ठोठावण्यात यावी, असा युक्तिवाद सरकार पक्षाने केला. तक्रारदारांतर्फे ॲड. ए. व्ही. औसेकर यांनी बाजू मांडली, तर बचाव पक्षातर्फे ॲड. सचिन झालटे पाटील यांनी युक्तिवाद केला. छळ आणि नैराश्येतून आईने मुलीचा खून केल्याची ही घटना दुर्मीळ असून, आरोपीची पार्श्वभूमी गुन्हेगारीची नसल्याने तिला कमीत कमी शिक्षा ठोठावण्यात यावी, असा युक्तिवाद बचाव पक्षाने केला. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यावर न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

# पुणे पुस्तक महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल राजेश पांडे यांचा सत्कार

पुणे - शहरात पुणे पुस्तक महोत्सव सलग दुसऱ्या वर्षी यशस्वीरित्या आयोजन केल्याचे निमित्त साधून नॅशनल बुक ट्रस्टचे विश्वस्त राजेश पांडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. येत्या शनिवारी (दि. २५) सायंकाळी पाच वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात हा सत्कार सोहळा होणार आहे.



अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, संवाद, पुणे आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार असून, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीव बर्वे आणि संवाद, पुणेचे अध्यक्ष सुनील महाजन यांनी निवेदनाद्वारे दिली आहे. यंदाचा पुस्तक महोत्सव भव्य-दिव्य स्वरूपात आयोजित केल्यामुळे लाखो वाचकांनी महोत्सवास भेट दिली आणि पुस्तक विक्री चांगली झाली. पुस्तक महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल राजेश पांडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अभिनंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यानंतर अभिजात वाचन संस्कृतीचा द्विपात्री संगीत-नाट्य आविष्कार ‘अक्षरगाणी’ हा कार्यक्रम सादर केला जाणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समूहशाळेची गरज’ शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांचे प्रतिपादन


वेल्हे : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणी करिता आणि दुर्गम, डोंगरी भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सध्या समूहशाळेची गरज असून राज्यातील पहिली समूहशाळा ठरलेली पानशेत शाळा ही राज्यासाठी पथदर्शी असल्याचे प्रतिपादन राज्याचे नवे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी केले.



शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी मावळते शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्याकडून पदभार घेतल्यानंतर प्रथमच राजगडसारख्या दुर्गम व डोंगरी तालुक्यातील शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी शनिवारी (ता.१८) रोजी पानशेत दौऱ्यावर आले होते. यावेळी ते बोलत होते. ग्रामीण भागातील शाळा, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थी व शिक्षकांच्या अडचणी याचा आढावा यावेळी घेण्यात आला. याप्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, डायट पुणेचे प्राचार्य नामदेव शेंडकर, राजगडचे गटशिक्षणाधिकारी राजकुमार बामणे, पानशेत बीटच्या प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी राजश्री गावडे, पानशेतचे केंद्रप्रमुख देवराम गायकवाड, पानशेत शाळेच्या मुख्याध्यापिका शबाना खान, पानशेत शाळेचे शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान या दौऱ्यात माध्यमिक हायस्कूल खानापूर, जिल्हा परिषद शाळा वरसगाव व जिल्हा परिषद शाळा देशमुखवाडी या शाळांना देखील अचानक भेट देऊन शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेणे व चांगले अधिकारी बनण्यासाठी कोणते गुण आवश्यक आहेत याचे सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थी व शिक्षकांनी वेळेत उपस्थित राहणे व शिस्त पाळणे ही बाब ही गरजेचे आहे. भविष्यामध्ये शालेय शिस्त कठोरपणे पाळणेबाबतचे निर्देशही दिले. पानशेत समूह शाळेमध्ये आनंददायी शनिवारनिमित्त सर्व विद्यार्थी मैदानात बसून आनंददायी उपक्रम अंतर्गत इंग्रजी नाट्यीकरण, कविता, नृत्य, भाषा व गणित खेळ याची पाहणी केली. स्वतः शिक्षण आयुक्त तब्बल चाळीस मिनिटे विद्यार्थ्यांमध्ये उभे राहून विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून संवाद साधत होते. विद्यार्थ्यांना गणित मराठी सामान्य ज्ञान या विषयावरती चौकस प्रश्न विचारून विद्यार्थ्यांकडून खुबीने उत्तरे प्राप्त करून घेत होते. विद्यार्थ्यांना विद्यार्थी मोजावयास लावणे, ९२ मध्ये किती मिळविल्यास १०० होतात, तुम्हास अभ्यास करून आयुष्यात काय व्हायचे आहे, इत्यादी प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. पानशेत शाळा व्यवस्थापन समिती , पालक, शिक्षक, केंद्रप्रमुख या सर्वांनी समूह शाळा गुणवत्ता वाढवणे संदर्भात व दर्जेदार होणे संदर्भात काय प्रयत्न करावे या संदर्भात सविस्तर सूचना दिल्या.

# बिबट्याने गलांडवाडी येथे पाडला ११ कोकरांचा फडशा

पुणे - गलांडवाडी (ता. दौंड) परिसरातील मुळीक वस्ती येथे बिबट्याच्या हल्ल्यामध्ये भिवाजी लकडे या मेंढपाळाच्या ११ कोकरांचा फडशा पाडला.



सदर घटना शनिवार दि. १८ रोजी दुपारी ४.०० वाजता घडली.

गलांडवाडी येथील शेतकरी सचिन रामभाऊ मुळीक यांच्या शेतामध्ये लकडे यांचा बकऱ्याचा कळप तात्पुरता बसण्यासाठी आला होता. आज नेहमीप्रमाणे लकडे यांचा मोठ्या बकऱ्यांचा कळप चरण्यासाठी शेतामध्ये गेल्यानंतर दिवसभर लहान कोकरु शेतात चालू शकत नसल्याने त्यांना राहुटी शेजारी जाळीमध्ये ठेवण्यात आले. बिबट्याने अचूक वेळ साधत या जाळीत ठेवलेल्या कोकरांवर हल्ला केला. सायंकाळी मेंढ्या चालून मुक्कामाच्या ठिकाणी परत आल्यानंतर लकडे यांच्या संबंधित बाब लक्षात आली. गावचे सरपंच रमेश पासलकर यांनी घटनास्थळी भेट दिली.

यासंदर्भात सरपंच रमेश पासलकर म्हणाले की, गेल्या आठवड्यापुर्वी या परिसरात एक बिबट्या जेरबंद करण्यात आला आहे. या घटनेमुळे या परिसरात अनेक बिबटे असण्याची शक्यता आहे. वनविभागाने तत्परता दाखवत त्वरित या परिसरात पिंजरा लावावा व बिबट्यांना जेरबंद करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

# फरार टेम्पो चालकाच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या; चाकण परिसरातून घेतले ताब्यात

पुणेः काल शुक्रवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पुणे नाशिक महामार्गावरील नारायणगाव परिसरात प्रवासी वाहतूक करणारे वाहन आणि टेम्पोचा भीषण अपघाताची घटना घडली होती. या अपघातामध्ये नऊ जणांचा दुर्देवी मृत्यू झाला होता. तर अनेकजण जखमी झाले होते. या अपघाताच्या घटनेनंतर टेम्पो चालक फरार झाला होता. या फरार टेम्पो चालकाला पोलिसांनी चाकण परिसरातून ताब्यात घेत अटक केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास नारायणगाव परिसरात प्रवासी वाहतूक करणारी मॅक्स ऑटो गाडीला पाठीमागून आलेल्या आयशर टेम्पोने जोराची धडकी दिली. आयशरने मागून धडक दिल्यामुळे मॅक्स ऑटो पुढे असलेल्या एसटी बसवरती फेकली गेली. यामुळे भीषण अपघात झाला. या अपघातमध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला असून यामध्ये चार महिला, चार पुरुष आणि एका बाळ यांचा समावेश आहे.

या अपघाताच्या घटनेनंतर टेम्पो चालकाने घटनास्थळावरून पळ काढला होता. तो हरियाणा राज्यात पलायन करण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. रोहित कुमार जगमालसिंग चौधरी असे या आयशर चालकाचे नाव आहे. या अपघातमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या मयतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५ लाखांची मदत जाहीर केली आहे. तसेच जखमींवर योग्य प्रकारे उपचार करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे त्यांनी एक्सवरून सांगितले आहे.

देवेंद्र फडणवीस पोस्ट

पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगाव जवळ झालेल्या भीषण अपघातात ९ कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना करतो. मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य मुख्यमंत्री सहायता निधीतून करण्यात येईल. जखमींच्या उपचाराची योग्य काळजी घ्या, असे मी पुणे पोलिस अधीक्षक यांना सांगितले आहे, अशी पोस्ट फडणवीस यांनी शेअर केली आहे.

# दिव्यांगांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही : उपमुख्यमंत्री पवार

पिंपरी-चिंचवड

दिव्यांगबांधवांना केवळ मदतीचा हात देऊन भागणार नाही. प्रशिक्षण देऊन योग्य संधी देणे महत्त्वाचे आहे. त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी राज्य सरकारकडून निधीची कमतरता भासू दिले जाणार नाही. जिल्हानिहाय ठराविक रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्याची सक्ती केली जाईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.



पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे आयोजित दिव्यांगांच्या पर्पल महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागाचे केंद्रीय सचिव राजेश आगरवाल, कलाकार दर्शिल सफारी, आमदार अण्णा बनसोडे, अमित गोरखे, उमा खापरे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह, पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, दिव्यांग कल्याण आयुक्त प्रवीण पुरी, पीएमआरडीए आयुक्त योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, दिव्यांग भवन फउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, परेश गांधी आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, की राज्यातील १३ कोटी लोकसंख्येपैकी ६५ लाख दिव्यांगबांधव आहेत. सर्व ३६ जिल्ह्यांत दिव्यांगांची आकडेवारी काढून त्यानुसार योजनांचा लाभ त्यांना दिला जाईल. त्यांचा निधी इतर कामांसाठी वापरला जाणार नाही. सरकारच्या दिव्यांग कल्याण विभागाकडे मनुष्यबळ नसल्यास आवश्यक त्या निधीची तरतूद तातडीने केली जाईल. ससून तसेच, उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र देण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल. विविध सेवा व सुविधांचा लाभ उपलब्ध करून देऊन दिव्यांगांच्या पंख्यांना बळ देण्याचे काम सर्वांनी करावे, असे आवाहन त्यांनी अधिकार्यांना केले.

भारतातील पहिला दृष्टिहीन चार्टर्ड अकाउंटंट भूषण तोष्णीवाल पिंपरी-चिंचवडचा आहे. सामाजिक चळवळीतील मानव कांबळे यांच्यासारखे अनेक दिव्यांग व्यक्तींची नावे घेता येतील. दुसरीकडे, दिव्यांग फेरीवाल्यांवर कारवाई करताना सबुरीने घेण्याचा सल्ला त्यांनी अधिकार्यांना दिला. कारवाईच्या वेळेस दिव्यांग विक्रेत्यांना विशेष बाब म्हणून सूट द्या. मात्र, उठसूठ कोठेही टपर्या टाकून शहर विद्रुप करू नका, असा सल्ला त्यांनी दिव्यांगांना दिला. भूगाव येथे दिव्यांगांसाठी घरांची योजना केली जात आहे. त्याला सरकारतर्फे सर्व प्रकारची मदत केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, की महापालिकेकडून शहरातील दिव्यांगांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यांना दिव्यांग फाउंडेशनच्या माध्यमातून विविध उपचार दिले जात आहेत. तसेच, कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार किंवा नोकरी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. केंद्रीय सचिव राजेश आगारवाल म्हणाले, की दिव्यांगांच्या व्यंगावर लक्ष न देता त्यांच्यावर व्यक्ती म्हणून फोकस करा. त्यांना प्रोत्साहन द्या. सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे म्हणाले, की घरातून बाहेर पडू शकणार्या व्यक्तींच्या घरी जाऊन महापालिकेने सर्वेक्षण करून त्यांना लाभ द्यावा. शहरातील पाच आमदारांनी दिव्यांगांच्या कल्याणासाठी अधिकाधिक निधी पालिकेस उपलब्ध करून द्यावा. सूत्रसंचालन विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी केले तर अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आभार मानले

# दहावी-बारावीचा निकाल १५ मेपर्यंत लागणार: शिक्षणमंत्री

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणार्या दहावी-बारावीच्या परीक्षेचा निकाल यंदा १५ मेपर्यंतच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळात शिक्षण विभागातील विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आढावा बैठक घेतली. या आढावा बैठकीनंतर भुसे यांनी पत्रकारांशी संवाद साधत पत्रकारांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली.



भुसे म्हणाले, बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा होण्यावर शिक्षण विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. ३० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा दहावी-बारावीची परीक्षा १५ ते २० दिवस अगोदर सुरू होईल, असे राज्य मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सुरू होण्यापूर्वीच जाहीर केले होते. त्याप्रमाणे यंदा परीक्षा लवकर सुरू होणार आहेत. यापूर्वी बारावीचा निकाल मे महिन्याच्या शेवटच्या किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात, तर दहावीचा निकाल जूनच्या दुसर्या-तिसर्या आठवड्यात जाहीर करण्यात येत होता. परंतु, गेल्या काही वर्षांत बारावीच्या परीक्षेचा निकाल मे महिन्याच्या तिसर्या किंवा चौथ्या आठवड्यात, तर दहावीचा निकाल जूनच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केला जात आहे.

**सर्व माध्यमांच्या शाळांना मराठी विषय बंधनकारक**

राज्यात एक लाखाहून अधिक शाळा, दोन कोटी दहा लाख विद्यार्थी आणि साडेसात लाख शिक्षक आहेत.राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व शाळांमध्ये राष्ट्रगीत झाल्यानंतर राज्यगीत म्हटले जावे, याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. सर्व माध्यमांच्या सर्व शाळांमध्ये मराठी विषय बंधनकारक करण्यात येईल. राज्यातील शाळांच्या गुणवत्तापूर्ण आणि भौतिक विकासाच्या दृष्टीने आराखडा तयार करण्यात येत आहे, असेही भुसे यांनी स्पष्ट केले.

# अनैतिक संबंधांतून महिला वकिलाच्या त्रासामुळे एकाने संपवलं आयुष्य

पुणे । प्रतिनिधी

बायकोला सोडून माझ्याबरोबर राहा, तुझ्या मुलाचे माझ्या मुलीशी लग्न करून दे आणि ३० लाख रुपयांची परतफेड कर, अन्यथा सूसमधील फ्लॅट नावावर कर, या कारणांवरून, अनैतिक संबंधातून एका महिला वकिलाने आपल्यासमोर लॉजमध्ये एकाला आत्महत्या करायला भाग पाडले.

अंकुश डांगे (वय ४५, रा. बालेवाडी) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी अंकुश डांगे यांच्या पत्नीने बंडगार्डन पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी माढा तालुक्यातील ४२ वर्षांच्या महिला वकिलावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना पुणे स्टेशनसमोरील होम लँड लॉजमध्ये ९ जानेवारी रोजी घडली. अंकुश डांगे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली, तेव्हा ही महिला वकील तेथे उपस्थित होती. या महिला वकिलाचा नवरा न्यायाधीश असून, त्यांना यांच्यातील अनैतिक संबंधांची कल्पना होती, असे पोलिसांनी सांगितले. आरोपी महिला वकील व अंकुश डांगे यांची व्यवसायातून ओळख झाली. त्यातून मैत्री व प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपी महिला वकिलाने ९ जानेवारी रोजी अंकुश डांगे यांना होमलँड लॉजमध्ये बोलावून घेतले. पत्नी व मुलीला सोडून दे व माझ्याबरोबर राहा, नाहीतर आत्महत्या कर, असे तिने अंकुश डांगे यांना सांगितले. तेव्हा अंकुश डांगे यांनी तिच्यासमोर गळफास घेऊन आत्महत्या केली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गणेश चव्हाण करत आहेत.